# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 1 | Marathi Monthly | Thane, Saturday , 1 July to 31 July-2023 | Pages 16 | Price : 10/-

## भांडवलदारांची तळी उचलणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी, सर्वसामान्यांचं जगणं महाग केलंय!

# राजन राजे यांचा, 'ईडी' सरकारवर निशाणा...



> प्रतिवर्षी १० टक्के वीजदरवाढ करता येते; परंतु, महाराष्ट्र शासन मात्र, आम्ही जनतेसाठी काम करतोय असे भासवून, प्रत्यक्षात ३७ टक्के एवढी प्रचंड दरवाढ आपल्यावर लादू पाहतंय. सर्वसामान्यांचं उत्पन्न वाढत नाहीये; पण, महागाई वाढत चाललीय. अन्न-वस्त्र-निवारा, यासोबतच शिक्षण, वीज आणि पाणी या मूलभूत गरजादेखील, आता आवाक्याबाहेर गेल्यात.

**ठाणे (प्रतिनिधी) : महापारेषण, महावितरण कंपन्यांचे खासगीकरण करण्याचा कुटील डाव तडीस जावा म्हणून, तब्बल ३७% एवढी प्रचंड वीजदरवाढ करण्याचे कट-कारस्थान महाराष्ट्र शासनाच्या वतीने रचले जात असून, त्याच्या निषेधार्थ 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे शहरात निदर्शनांची मालिका सुरु करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर, शिंदे-फडणवीस सरकारचा, ''डबल इंजिनचे 'ईडी' सरकार'' असा उल्लेख करीत, राजन राजे यांनी, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या धोरणांवर एकच हल्लाबोल केला.** ''एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या 'ईडी' सरकारने, वीजदरवाढीचा निर्णय घेतलेला आहे. वीज नियामक मंडळाच्या निकषानुसार, प्रतिवर्षी १० टक्के वीजदरवाढ करता येते; परंतु, महाराष्ट्र शासन मात्र, आम्ही जनतेसाठी काम करतोय असे भासवून, प्रत्यक्षात ३७ टक्के एवढी प्रचंड दरवाढ आपल्यावर लादू पाहतंय. सर्वसामान्यांचं उत्पन्न वाढत नाहीये; पण, महागाई वाढत चाललीय. अन्न-वस्त्र-निवारा, यासोबतच शिक्षण, वीज आणि पाणी या मूलभूत गरजादेखील, आता आवाक्याबाहेर गेल्यात. **भांडवलदारांची तळी उचलणाऱ्या या 'ईडी' सरकारने आता, सर्वसामान्यांचं जगणं 'महाग' करुन ठेवलंय!'' अशा शब्दात राजन राजे यांनी, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनावर यावेळी आपल्या आक्रमक शैलीत निशाणा साधला. ''या प्रस्तावित वीजदरवाढीविरोधात, कोणताही राजकीय पक्ष तुम्हाला रस्त्यावर आंदोलन करताना दिसणार नाही. वीजदरवाढीच्या बातम्या किंवा एखादी चर्चा, एकाही वृत्तवाहिनीने घडवून आणलेली नाही; परंतु, अयोध्या आणि राममंदिर यावर, छापलेले रकानेच्या रकाने, तसेच टिव्हीवर त्यासंबंधीच्या बातम्यांचा महापूर अगदी ओसंडून वाहतोय.** त्यातच आता 'आयपीएल'चे खेळ सुरु आहेत; म्हणजे, सतत आम्हाला कुठल्या न् कुठल्या नादाला लावून ठेवायचं, पोटाच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळच द्यायचा नाही. मात्र, 'धर्मराज्य पक्ष' असा एकमेव राजकीय पक्ष आहे, जो सर्वसामान्यांच्या मूलभूत व ज्वलंत प्रश्नांसाठी वेळोवेळी सनदशीरमार्गाने रस्त्यावर उतरलेला आहे!'' असेही पक्षाध्यक्ष राजन राजे यांनी बोलताना म्हटले.

दरम्यान, **राजन राजे यांनी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर देखील एकच शरसंधान साधले. ''शरद पवारांनी, शाहू-फुले-आंबेडकर यांच्या नावांचा वापर फक्त आपल्या जातीय राजकारणासाठीच केला; प्रत्यक्षात मात्र, त्यांनी आतापर्यंत भांडवलदारांचीच पाठराखण करुन, जनतेला टोप्या घालण्याचं काम केलंय. अदानी हा मोदींचा नंतर मित्र झाला, त्याआधी तो शरद पवारांचा मित्र म्हणून ओळखला जातो. म्हणूनच, अदानीच्या 'जेपीसी' चौकशीला, पवारांनी आता विरोध दर्शवलाय.** कोकाकोला, पेप्सी, थम्सअप यांच्या सुरक्षिततेबद्दल जेव्हा देशभरातच नव्हे; तर, जगभरात गदारोळ माजला होता, त्यावेळी...*(पान क्र. ३ वर)*

## ठाण्यातील सेवा रस्त्यांवरील मोफत वाहनतळांबाबतचे निकष जाहीर करण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) :** शिवछत्रपती, ठाणे महानगरपालिकेच्या वतीने, नागरिकांसाठी मोफत वाहनतळाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. पहिल्या टप्प्यात नितीन कंपनी ते तीन हात नाका आणि नितीन कंपनी ते ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या सेवा रस्त्यावर ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली...*(पान क्र. ६ वर)*

## ''कोकण, हा जागतिक-जैवविविधतेचा वारसा, तो प्राणपणाने जपलाच पाहिजे!''

### पर्यावरणदिनाच्या पार्श्वभूमीवर, राजन राजे यांचे ठाण्यात प्रतिपादन...

**स्थती ठाणे (प्रतिनिधी):** ठाणे ''जैवविविधतेने समृध्द असलेले कोकण हे... त्यामुळे, केवळ बारसूला 'जागतिक सांस्कृतिक-वारसा' असलेलं 'कातळशिल्प' आहे म्हणूनच नव्हे; तो मुद्दा आहेच... पण, कोकण, हे निसर्गाचं अलौकिक लेणं आहे. काश्मीर भारताचं नंदनवन असेल; तर, कोकण हा 'जागतिक जैवविविधतेचा वारसा' आहे आणि तो अत्यंत पराकोटीने व काळजीपूर्वक जपला पाहिजे. धूर ओकणारा, प्रचंड कार्बन-उत्सर्जन करणारा जगाच्या...*(पान क्र. ५ वर)*


अंतरंग



अजय जया यांचा, 'प्रशांत कॉर्नर'प्रकरणी ठामपा आणि पोलिसांवर थेट आरोप...
पृष्ठ क्र. ४



''धर्मराज्य पक्ष आणि धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघात आलात... आता, 'राजन राजे' हा पंचाक्षरी मंत्रच तुम्हाला तारु शकतो!''
पृष्ठ क्र. ८




'मन की बात' नहीं... 'मणिपूर की बात' करो !!!
राजन राजे, (अध्यक्ष)
पृष्ठ क्र. ९

## महिला कुस्तीपटूंना फरफटत नेण्यामागे, दिल्लीश्वर सरकारच खरे सूत्रधार!

# कुस्तीगीर महिलांच्या लैंगिक शोषणाविरोधात, राजन राजेंचा जोरदार घणाघात...




**ठाणे (प्रतिनिधी) : ''दिल्लीतील महिला कुस्तीपटुंच्या कथित लैंगिक शोषणासंदर्भातील निदर्शनात सहभागी होताना, आम्हाला वेदनाही होतायेत आणि आमच्या अंत:करणातून एकप्रकारची स्फूर्तीदेखील जागृत झालेली आहे. कारण, हे आंदोलन आता, दिल्लीपुरतं मर्यादित राहिलेलं नाही, ते आता देशभरात पसरलंय. ज्यांनी भारताचा गौरव सातासमुद्रापार नेला, ज्यांचा आम्हाला अभिमान वाटतो, अशा आमच्या महिला ऑलिम्पिकपटूंना, उपोषणस्थळावरुन ज्यापद्धतीने फरफटत नेलं, त्यामागे दिल्ली पोलीस नसून; तर, पडद्यामागून ज्यांनी सूत्रं हलवली, त्यांचं नाव 'दिल्लीश्वर-सरकार' आहे. याचा निषेध करावा तेवढा थोडा आहे!'' अशा शब्दात 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, आपला संताप व्यक्त करुन, मोदी सरकारवर जोरदार घणाघात केला.** कुस्तीगीर महिला लैंगिक अत्याचारविरोधी खेळाडू आणि नागरिक समिती, मुंबई व विविध क्रीडा तसेच सामजिक संघटना यांच्या वतीने दादर रेल्वे स्टेशन समोरच्या सुविधा स्टोअरजवळ आयोजित केलेल्या निषेध आंदोलनाप्रसंगी ते बोलत होते.

'मोदी-शाह'पुरस्कृत बेबंदशाहीवर शरसंधान साधताना, राजन राजे पुढे म्हणाले की, **''एका बाजूला नव्या संसद भवनाच्या उद्घाटनादिवशी, 'सेंगोल'ची नाटकं करत, देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना न बोलवता, त्यांचा घनघोर अपमान करता, माजी राष्ट्रपती कोविंद यांनाही आमंत्रण दिले नाही... अनेक पायंडे तोडलेत, जे आजपर्यंत या देशात कधीही घडलं नव्हतं. पंतप्रधान म्हणून नव्हे; तर, एखाद्या अनभिषिक्त सम्राटासारखा, त्यादिवशी राज्याभिषेक सोहळाच जणू सुरु होता... आणि, त्याचवेळी दुसऱ्या बाजूला, आपल्यावरील झालेल्या अत्याचाराविरोधात दाद मागण्यासाठी बसलेल्या महिला कुस्तीगीरांना, अक्षरशः गुरासारखं फरफटत नेता, ही कुठली लोकशाही?'' असा संतप्त सवाल राजे यांनी यावेळी आपल्या भाषणातून उपस्थित केला.**

या निषेध आंदोलनाला उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना राजन राजे पुढे म्हणाले, ''सचिन तेंडुलकरसारखी मंडळी, अदानी-अंबानी आणि भाजपाई भांडवली-व्यवस्थेच्या ताटाखालची मांजरं झाल्यासारखी वागतातयत, हे दुर्दैव आहे. पण, अशावेळी, १९८३चा विश्वविजेता भारतीय क्रिकेट संघ असो किंवा प्रवीण ठिपसेंसारखे बुद्धिबळपटू असोत, त्यांचा अंतरात्मा जागा झाला, ही बाब महत्त्वाची. **मोदी-शाहांचं बोलायचं एक आणि करायचं वेगळं असंच चाललंय. ''बेटी बचाओ... बेटी पढाओ'', म्हणायचं आणि त्यांच्याच खासदाराने महिला खेळाडूंचं कथित लैंगिक-शोषण करायचं? तुमच्यापैकी एकाने तरी, त्याबाबतचे ऋखठ वाचले असतील तर, अंगावर काटा उभा राहतो. आणखी दुसरा कोणता पुरावा हवाय? पोक्सो (POCSO) कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवलेला असतानाही, अद्याप बृजभूषण सिंगवर अटकेची कारवाई झालेली नाही.** आणि, आतातर, याप्रकरणी खेळाडूंच्या कुटुंबियांवर एवढा दबाव वाढलाय की, अल्पवयीन महिला खेळाडूच्या वडीलांनी तर, पत्रकारांशी बोलताना म्हटलं की, ''डर के मारे, हम हमारा बयान पिछे ले रहे है''... अशी भीषण परिस्थिती असल्याचं राजन राजे म्हणाले. मिलिंद रानडे यांच्या पुढाकारातून आयोजित, या निषेध आंदोलनात ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे, महेंद्र चेंबूरकर, फिरोज मिठीबोरवाला, प्रा. संगीता जोशी, जय कवळी, मनोहर साळवी आणि राजू महाले आदी मान्यवर उपस्थित होते.

# घोडबंदर रोडवरील काजूपाडा येथील, अनधिकृत झोपड्यांवर कारवाई करण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : घोडबंदर रोडवरील, काजूपाड्याच्या समोरील बाजूस असणाऱ्या, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पायथ्याशी, गेल्या काही महिन्यांपासून मोठ्याप्रमाणात अनधिकृत झोपड्या वाढीस लागलेल्या असून, सदर बांधकामाकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सोयीस्करपणे दुर्लक्ष केल्याचे निष्पन्न झालेले आहे.** आगामी पावसाळ्यात दरड कोसळून जीवितहानी व दुर्घटना होऊ नये, यावर खबरदारीचा उपाय म्हणून, काही दिवसांपूर्वी कळव्याच्या पारसिक डोंगराच्या पायथ्याशी उभ्या राहिलेल्या अनधिकृत झोपड्यांवरील तोडक कारवाईची... *(पान क्र. ७ वर)*



# खोपोली-पाली महामार्गावर गतिरोधक न उभारल्यास, 'धर्मराज्य पक्षा'चा तीव्र जनआंदोलनाचा इशारा

**पाली-सुधागड (प्रतिनिधी) :** मुंबई आणि पुण्याहून कोकणात जाणारा सोयीचा मार्ग म्हणून, खोपोली-पाली-वाकण या रस्त्याचा वापर पूर्वीपासून करण्यात येत आहे. सध्या या मार्गाचे रुंदीकरण झाल्याने, कधीकाळी अरुंद असणाऱ्या या राज्यमार्गाचे आता, राज्य-महामार्गात रुपांतर झालेले आहे. प्रवासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेला हा महामार्ग, मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय मानला जातो. परिणामी, या महामार्गावरुन वाहनांची वर्दळ आणि वेग प्रचंड प्रमाणात वाढले असून, ही वाहतूक स्थानिक गावकऱ्यांसाठी मात्र, जीवघेणी ठरत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, **खोपोली ते पाली या ३५ किमीच्या संपूर्ण महामार्गावर, दुतर्फा गावे वसलेली असून, लोकवस्तीचे प्रमाणदेखील मोठे आहे. शिवाय महामार्गालगतच शाळा आणि बाजारपेठा (परळी/पेडली) असल्याने, विद्यार्थी व स्थानिक ग्रामस्थांचा याठिकाणी सातत्याने वावर असतो. मध्यंतरीच्या काळात खोपोली-पाली महामार्गावर अपघातांच्या दुर्घटनाही घडलेल्या आहेत. रात्रीच्या वेळी तर, वाहनांचा वेग प्रचंड प्रमाणात असतो, यामुळे जीवघेणा अपघात होण्याची दाट शक्यता असते. सुधागड तालुक्यातील पाली हे शहर, तालुक्याचे मुख्य ठिकाण तर आहेच, त्याचबरोबर अष्टविनायक गणपतीचे तीर्थक्षेत्रदेखील असल्यामुळे, या महामार्गावरुन मोठ्याप्रमाणात वाहतूक होत असते. असे असतानाही, खोपोली-पाली-वाकण या संपूर्ण महामार्गावर एकही गतिरोधक का उभारण्यात आलेला नाही? याचे आश्चर्य वाटत आहे.**



खोपोली-पाली रस्त्यावरील इमॅजिका रिसॉर्टपर्यंतच गतिरोधक उभारण्यात आलेले असून, त्यानंतर पालीच्या दिशेने जाणाऱ्या महामार्गावर एकही गतिरोधक अस्तित्वात नाही. आधीच निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि ठेकेदारांच्या कामचुकारपणामुळे वादग्रस्त ठरलेला हा खोपोली-पाली-वाकण महामार्ग आता कुठे प्रदीर्घ कालावधीनंतर, पूर्णत्वास आलेला असला तरी, सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तो अद्याप परिपूर्ण झालेला नसून, स्थानिक ग्रामस्थांच्या जीवितास निर्माण होणारा धोका टाळण्यासाठी, या संपूर्ण महामार्गावरील प्रत्येक गावाच्या परिसरात 'इंडियन रोड काँग्रेस'च्या (IRC) मानांकनाप्रमाणे आणि शास्त्रोक्त (तंत्रशुद्ध) पद्धतीने गतिरोधक उभारण्यात यावेत, अन्यथा 'धर्मराज्य पक्ष' याप्रकरणी तीव्र जनआंदोलन उभारेल, असा इशारा पक्षाचे प्रसिद्धीप्रमुख व 'धर्मराज्य आंदोलन समिती'चे सदस्य संजय गणोजी दळवी यांनी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे एम.डी. व उपसंचालक राधेश्याम मोपलवार यांना लिहिलेल्या पत्रात दिला आहे.

## राजन राजे यांचा, 'ईडी' सरकारवर निशाणा...

...(पान क्र. १ वरुन)

नेमण्यात आलेल्या 'जेपीसी' समितीचे अध्यक्ष हेच शरद पवार होते. 'जेपीसी'च्या त्यावेळच्या चौकशीमुळेच, आज ही विदेशी शीतपेये ग्राहकांसाठी सुरक्षित आहेत, एवढी या समितीमध्ये ताकद आहे. इतकी की, प्रसंगी पंतप्रधानांनादेखील चौकशीसाठी बोलावण्याचा अधिकार 'जेपीसी'ला आहे आणि आज, हेच शरद पवार 'जेपीसी'ला विरोध करतायेत, किती हा विरोधाभास आहे. अदानीच्या कंपनीत २० हजार कोटी रुपये कुठून आले, याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाची समिती काही करु शकत नाही; मात्र, 'जेपीसी' कठोर कारवाई करु शकते. भांडवलदार आणि राजकारणी यांचं गुन्हेगारी संगनमत कुठेतरी उघडं पडू शकतं म्हणूनच, शरद पवारांसह, देशातील अनेक राजकारण्यांना, विशेषत: भाजपवाल्यांना अदानीची 'जेपीसी' चौकशी नकोय.

कारण, राजकारण्यांना भांडवलदारांच्या जीवावर निवडणुका जिंकता येतात आणि सर्वसामान्यांवर सत्ता गाजवता येते. देशातील मूठभर भांडवलदारांच्या हातात देशाची अर्थव्यवस्था जाऊ नये, यासाठी आमचा हा लढा असून, आमच्या परीने आम्ही जनतेला जागृत करीत आहोत. वीजदरवाढीविरोधातील आमचं हे आंदोलन, त्याचाच भाग आहे आणि त्यासाठी जनतेने आता, उत्स्फूर्तपणे रस्त्यावर उतरणे ही काळाची गरज उरलीय!'' अशा परखड भाषेत राजन राजे यांनी आपलं मत मांडले. या आंदोलनाप्रसंगी, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष नरेंद्र पंडित, 'धर्मराज्य आंदोलन-समिती'चे कार्यवाह संतोष तावडे, समितीचे सदस्य संजय दळवी, आदी पदाधिकाऱ्यांसह, अमित लिबे, वरुण सावंत, नरेश पाटील, विजय सोनवणे, राजेंद्र राऊत, असिफ शेख, बाबासाहेब शिर्के इत्यादी कार्यकर्ते आणि कामगार सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते.




राजन राजे
(अध्यक्ष)

मोदी-शाहांच्या 'भाजपा'ई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुन, अवघ्या कामगार-कर्मचारीवर्गाला, आर्थिक समृध्दीने आश्वस्त करण्याचा आणि त्यांना स्वाभिमानाने जगण्यासाठीचा वसा हाती घेतलेल्या, 'धर्मराज्य पक्ष'प्रणित

'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

या कामगार संघटनेत सामील व्हा !!!







महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७


कार्यालयीन पत्ता : रविदर्शन, तळमजला, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, डीएनएस बँकेच्या मागे, राममारुती क्रॉस रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०

# माझ्यावरील कारवाई राजकीय दबावामुळेच!

## अजय जया यांचा, ‘प्रशांत कॉर्नर’प्रकरणी ठामपा आणि पोलिसांवर थेट आरोप...

**ठाणे (प्रतिनिधी) : ठाणे शहरातील ‘प्रशांत कॉर्नर’ या मिठाईच्या दुकानावर, ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने केलेल्या तोडक कारवाईनंतर, समाजसेवक आणि आरटीआय कार्यकर्ते अजय जया यांनी, या ‘तथाकथित’ कारवाईमागील नेमकी सत्यता उघड केल्याची शिक्षा म्हणून, थेट त्यांच्यावरच गुन्हा दाखल करण्याचा भीमपराक्रम, नौपाडा पोलीस स्टेशनने मंगळवार, दि. ३० मे–२०२३ रोजीच्या मध्यरात्रीनंतर, सुमारे अडीच वाजताच्या सुमारास केला होता. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी म्हणून, अजय जया यांनी, ठाणे पोलीस आयुक्त आणि ठाणे महापालिकेच्या आयुक्तांसह, थेट मुख्यमंत्र्यांकडे पत्रव्यवहार केला होता. मात्र, या चौकशीची मागणी प्रशासनाने जया यांच्यावरच उलटवून, थेट त्यांच्यावरच गुन्हा दाखल केला होता. यासंदर्भात न्यायालयाने पोलीस कोठडी न सुनावता, न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर, ठाणे सत्र न्यायालयाने त्यांना गुरुवारी जामीन मंजूर केला.**

दरम्यान, ‘प्रशांत कॉर्नर’ येथे कथितरित्या खरेदीसाठी आलेल्या खा. श्रीकांत शिंदे यांच्या पत्नीचा दुखावलेला अहंकार आणि त्यानंतर दुकानावर झालेली तोडक कारवाई, यासंदर्भात अजय जया यांनी, दुकानाचे मालक श्री. प्रशांत सकपाळ यांची बाजू मांडत, ठाण्याचे पोलीस आयुक्त, ठामपाचे आयुक्त यांच्यासह थेट मुख्यमंत्र्यांना पत्रव्यवहार करुन, याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी केली. मात्र, दुर्दैवाने हे प्रकरण अजय जया यांच्यावरच उलटे फिरले. ‘प्रशांत कॉर्नर’च्या सकपाळ यांनी, लागलीच पत्रकार परिषद घेऊन, अशी कोणती घटना घडलेलीच नाही, हा शिंदे कुटुंबीयांना बदनाम करण्याचा डाव आहे, अजय जया यांचे सर्व आरोप खोडसाळ व निराधार आहेत अशापद्धतीचे विधान केले. अर्थात प्रशांत सकपाळ यांच्यावर आलेल्या राजकीय दबावातूनच त्यांनी माघार घेतली असली तरी, ठाणे महापालिका आणि पोलीस प्रशासनाने, संगनमताने व सूडबुद्धीने, राजकीय दबावापोटी माझ्यावर ही, कारवाई केली असल्याचा थेट आरोप अजय जया यांनी, पत्रकार परिषदेत केला असून, सत्य कधीच लपून राहणार नाही, हेदेखील तितकेच खरे असल्याचेही त्यांनी, यावेळी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

दरम्यान, **अजय जया हे ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे शहर संघटक म्हणून कार्यरत असले तरी, त्यांची खरी ओळख ही, समाजसेवक व आरटीआय कार्यकर्ता अशीच आहे. कधी पक्षाच्या माध्यमातून तर, कधी वैयक्तिक पातळीवर त्यांनी, ठाण्यातील भल्या–भल्या प्रस्थापित धनदांडग्यांशी निडरपणे संघर्ष उभा केलाय. माहितीच्या अधिकाराच्या माध्यमातून त्यांनी, ठाणे महापालिका आणि शासकीय आर्थिक घोटाळा उघड केलाय. यात ठाणे वाहतूक शाखेचा गैरव्यवहार, विकासकामांच्या नावाखाली स्थानिक लोकप्रतिनिधी, ठेकेदार आणि महापालिका अधिकारी यांच्या संगनमताने झालेला कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार, येऊरमधील अनधिकृत बांधकामांबाबत उठवलेला आवाज, ठाण्याच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांनी, उद्धव ठाकरे यांच्याविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यासंदर्भात केलेली तक्रार, श्रीनगर पोलीस स्टेशनमध्ये शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशनला बेकायदेशीर घेराव घालून, निर्माण केलेली दंगलसदृश्य परिस्थिती याविरोधात केलेली तक्रार आणि पाठपुरावा, अजय जया यांना आलेल्या धमक्या, त्यांच्यावर झालेले हल्ल्याचे प्रयत्न याबाबत अनेकवेळा पोलीस प्रशासनाकडे दाद मागूनही, पोलीस संरक्षणाची लेखी मागणी करुनही, त्याबाबत कायदेशीर कारवाई दूरच, त्यांच्या सुरक्षिततेकडेही वेळोवेळी दुर्लक्ष करण्यात आले होते.** गेल्या दहा वर्षांपासून सामाजिकक्षेत्रात कार्यरत असताना, एकही राजकीय/सामाजिक गुन्हा दाखल नसलेल्या अजय जया यांच्यावर, ‘प्रशांत कॉर्नर’प्रकरणी दाखल झालेला गुन्हा आणि त्यांच्यावरील अटकेची कारवाई, निव्वळ राजकीय सूडबुद्धीने व राजकीय दबावापोटीच झालेली असल्याचे ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी, यावेळी ठामपणे स्पष्ट केले. यासंदर्भातली चर्चा आता, ठाणे शहराच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात रंगली असून, ठाण्यातील राजकीय बेबंदशाहीचा खरा चेहरा जनतेसमोर आला असल्याचेही राजे यावेळी म्हणाले.

दरम्यान, आपण उभारलेला हा लढा; ही, एक ‘सामाजिक–क्रांति’ असून, ठाणे शहरातील वाढती राजकीय–दडपशाही आता, उघडपणे रस्त्यारस्त्यावर आणि गल्लोगल्ली दिसून येतेय. ती ठेचून काढण्यासाठी सत्याचा, लोकशाहीचा मार्ग अवलंबून, शेवटच्या श्वासापर्यंत, समाजाचं शोषण करणाऱ्या या, व्यवस्थेविरोधात लढत राहणार असल्याचे अजय जया यांनी, पत्रकार परिषदेत शेवटी स्पष्ट केले. यावेळी ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर उपस्थित होते.



गेल्या दहा वर्षांपासून सामाजिकक्षेत्रात कार्यरत असताना, एकही राजकीय/सामाजिक गुन्हा दाखल नसलेल्या अजय जया यांच्यावर, ‘प्रशांत कॉर्नर’प्रकरणी दाखल झालेला गुन्हा आणि त्यांच्यावरील अटकेची कारवाई, निव्वळ राजकीय सूडबुद्धीने व राजकीय दबावापोटीच झालेली असल्याचे ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी, यावेळी ठामपणे स्पष्ट केले.




प्रसारमाध्यमातून साभार




**२६ मे-२०२३ रोजी ठाण्यातील 'प्रशांत कॉर्नर' दुकानात, सत्तेच्या अहंकारातून 'राजकीय इशाऱ्या'ने, 'ठामपा'करवी जी दहशतवादी तोडफोड करण्यात आली होती... त्या, कटू व अत्यंत निंदनीय प्रसंगाच्या 'मासिकपूर्ति'च्या निमित्ताने...!!!**

**संपूर्ण महिना उलटून गेला तरीही....**

- 'प्रशांत कॉर्नर'च्या एकूणएका कर्मचाऱ्याची, यासंदर्भात चौकशी का केली गेली नाही... संपूर्ण प्रसंग विदीत करणारी त्यांची शपथपत्रं का घेतली गेली नाहीत व अजूनही आजुबाजुच्या लोकांकडून वादग्रस्त प्रसंगाबाबत सखोल विचारणा का होत नाहीय?
- त्या वादग्रस्त प्रसंगावेळचं, संपूर्ण दुकानातलं (दुकानाच्या आतबाहेरचं) CC Footage का उपलब्ध केलं जात नाहीय; तसेच, आजुबाजुचंही CCTV Footage का घेतलं जात नाहीय?
- याशिवाय, संबंधितांच्या मोबाईलचा (ड्रायव्हर, बॉडीगार्डसकट) CDR घेतला तर, 'दूध का दूध, पानी का पानी' सहजी होऊ शकेल....
- पहाटे साडेपाच वाजता जर, गुन्ह्याची नोंद होते व कथितरित्या, त्यानंतर काहीकाळाने त्यावर सक्षम अधिकाऱ्याची सही होते...आणि, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे-संघटक व कार्यकर्ते असलेल्या 'अजय जया'च्या घरी तर पोलिस, त्याअगोदरच तीन-साडेतीन तास म्हणजे, पहाटे २.०० च्या सुमारास, एखाद्या दरोडेखोर वा अतिरेक्याला पकडण्यासाठी धाड घालावी तसे, हाती कुठलीही कायदेशीर कागदपत्रं न घेता किंवा रीतसर नोटीस न देताच... आक्रमकपणे व छुप्यारितीने पोहोचलेच कसे?

---

## ''कोकण, हा जागतिक-जैवविविधतेचा वारसा, तो प्राणपणाने जपलाच पाहिजे!''...

(पान क्र. १ वरुन)

कानाकोपऱ्यात कुठेही होत असलेला 'तेलशुद्धीकरण-प्रकल्प' हा, जागतिक-तापमानवाढीची अक्राळविक्राळ पर्यावरणीय समस्या पाहाता, त्याज्यच... परंतु, कोकणासारखी निसर्गसुंदर अलौकिक भूमी, ही त्यासाठी सर्वात अयोग्य जागा होय!'' असे जाहीर आवाहन 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, सोमवारी ठाण्यात केले. **आंतरराष्ट्रीय पर्यावरणदिनाचे औचित्य साधून, राजापूर तालुक्यातील विनाशकारी बारसू रिफायनरी व पेट्रो-केमिकल प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी, बारसू रिफायनरी-विरोधी राज्यव्यापी लढा समिती आणि पर्यावरण बचाव कृती समिती, ठाणे यांच्या वतीने सोमवार, दि. ५ जून-२०२३ रोजी, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ निदर्शने करण्यात आली. यावेळी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना राजन राजे पुढे म्हणाले की, ''तेल-शुद्धीकरणाचे प्रकल्प, जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही होवोत, ते प्रदूषणकारीच आहेत आणि अशा प्रकल्पांसाठी कोकण ही, अत्यंत अयोग्य जागा आहे'' असे ठाम प्रतिपादन राजे यांनी करुन, ''आता अवघ्या विश्वाची जीवनशैली, अर्थव्यवस्था संपूर्णपणे बदलण्याची वेळ आलीय... आपल्याला गांधीवादाखेरीज दुसरा कुठलाही पर्याय नाही. कायमस्वरुपी-शाश्वत, जे निसर्गावर कमीतकमी आघात करणारे असेल, अशी जीवनशैली आपल्याला स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नसताना, आपण आपल्या पुढच्या पिढीचं आयुष्य धोक्यात घालतोय. एक-दोन-चार पिढ्या मजा मारुन जाणार आणि पुढल्या पिढीच्या भविष्यात, तुम्ही अंधाराचं ताट वाढून ठेवणार आहात का?'' असा संतप्त सवाल राजे यांनी, बोलताना उपस्थित केला.**

दरम्यान, या आंदोलनाप्रसंगी, ''रद्द करा... रद्द करा, विनाशकारी रिफायनरी प्रकल्प रद्द करा!'' ''कोकण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे!'' ''एकच जिद्द, रिफायनरी रद्द!'' अशा गगनभेदी घोषणा आंदोलकांकडून देण्यात आल्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, स्थानिक




जनतेचा प्रकल्पाला विरोध असेल तर, त्यांच्यावर आम्ही प्रकल्प लादणार नसल्याचे वक्तव्य एकदा केले होते, तोच धागा पकडून, **राजन राजे म्हणाले की, ''स्थानिक जनतेच्या असंतोषाचा उद्रेक बारसूत झालेला आहे आणि त्याचे पडसाद इकडे ठाण्यात उमटलेले आहेत. जे जे या आंदोलनाशी निगडित आहेत, अशी अनेक मंडळी आज इथे आलेली आहेत. जीवन सुरक्षित राखणं ही, आपली सगळ्यांची जबाबदारी आहे. पुढच्या उण्यापुऱ्या दोन-चार दशकांतच, परिस्थिती अतिशय भयावह होईल...** आताच तुम्हाला उष्णतेच्या लाटा भाजून काढतायेत, समुद्राची पातळी वाढायला लागलीय, अंटार्टीका आणि जगभरातील बर्फ वितळायला लागलाय, तेव्हा काय परिस्थिती होईल याची तुम्ही कल्पना करु शकणार नाही. नव्वद-शंभर-सव्वाशे फुटांपर्यंत समुद्राची पातळी वाढेल, हे सगळं कार्बनमुळेच होतंय. मोटारींच्या उत्सर्जनातून दरवर्षी, एकहजार टन इतका कार्बन हवेत सोडला जातो. त्यातील पंच्याहत्तर टक्के कार्बन हा, मोटारींचा आहे... आणि म्हणूनच, मूलत: आपल्याला जीवनशैली आणि अर्थव्यवस्था बदलावी लागेल, साधी-सोपी जीवनशैली स्वीकारावी लागेल, जी आमच्या महात्मा गांधींनी, भारतीय अध्यात्माने सांगितलीय. आम्हाला आता, गंभीर होऊन या सगळ्या पर्यावरणीय समस्यांच्या पार्श्वभूमीवर, वेगळा विचार करावा लागेल आणि हाच संदेश सर्वसामान्यांत पोहोचविण्यासाठी, विनाशकारी रिफायनीला प्राणपणाने विरोध करण्यासाठी, आम्ही सगळेजण आता संघटित झालेलो आहोत!'' अशा शब्दांत 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, आपल्या भावना व्यक्त केल्या.

दरम्यान, या आंदोलनाप्रसंगी, ठाणे शहरातील सामाजिक कार्यकर्ते संजय मं.गो., जगदीश खैरालिया, आंदोलनाचे निमंत्रक सत्यजीत चव्हाण, उदय चौधरी, शिरीष मेढी, वंदना शिंदे, पर्यावरणवादी कार्यकर्त्या प्रणाली राऊत, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे प्रवक्ते चंद्रभान आझाद, 'धर्मराज्य पक्षा'चे माहिती-अधिकार ठाणे कक्षप्रमुख अनिल महाडिक, पक्षाच्या आंदोलन समितीचे प्रमुख कार्यवाह संतोष तावडे, आंदोलन समिती सदस्य संजय दळवी, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे कामगार प्रतिनिधी अरविंद सावंत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## मोफत वाहनतळांबाबतचे निकष जाहीर करण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी...*(पान क्र. १ वरुन)*

असून, दुसऱ्या टप्प्यात ती माजिवड्यापर्यंत सुरु करण्यात येणार आहे. या सेवा रस्त्यांवर पार्किंग क्षेत्र निश्चित करुन, त्याठिकाणी मोफत वाहने उभी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय ठाणे महानगरपालिका प्रशासनाने घेतलेला आहे. याच पार्श्वभूमीवर **'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, ठाणे महापालिकेचे आयुक्त अभिजित बांगर आणि ठाणे वाहतूक शाखेचे उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड यांना, संयुक्तपणे पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे की, ठाणे शहरातील सेवा रस्त्यांवर वाहने उभी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय, ठाणे महापालिका प्रशासनाने घेतलेला असला तरी, नितीन कंपनी सिग्नल ते माजिवडा जंक्शन येथील उड्डाणपुलापर्यंत, जुनी-नवीन वाहने खरेदी-विक्री करणारी दुकाने आणि गॅरेजेस मोठ्याप्रमाणात असून, त्यांच्या दुचाकी/चारचाकी गाड्या याच सेवा रस्त्यांवर उभी करण्यात आलेली असतात. या बेकायदेशीर पार्किंगमुळे सेवा रस्त्यावरुन धावणाऱ्या वाहनांना आणि पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असून, यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे.** त्यामुळे ठाणे महापालिका प्रशासनाकडून मोफत वाहनतळाची सुविधा उपलब्ध करुन देण्यापूर्वी, अशाप्रकारे सेवा रस्त्यांचा दुरुपयोग करणाऱ्या वाहनविक्रेत्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात? असा महत्त्वाचा प्रश्न, पत्राच्या माध्यमातून यानिमित्ताने महेशसिंग ठाकूर यांनी उपस्थित केला आहे. आधीच ठाणे शहरात वाहतुककोंडी आणि पार्किंगची समस्या गंभीर झालेली असतानाच, गेल्या अनेक वर्षांपासून नितीन कंपनी सिग्नल ते माजिवडा जंक्शन येथील उड्डाणपुलापर्यंतच्या, जुनी व नवीन वाहने खरेदी-विक्री आणि दुरुस्ती करणाऱ्या व्यक्तींवर आतापर्यंत ठाणे महानगरपालिका आणि ठाणे वाहतूक शाखा यांच्याकडून कारवाई करण्यात आलेली नाही. यासंदर्भात 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने पत्रव्यवहार करुनही, त्याबाबतची कोणतीही दाखल घेण्यात आलेली नसल्याचे महेशसिंग ठाकूर यांनी, ठामपा आयुक्त आणि वाहतूक उपायुक्त यांना पाठविलेल्या पत्राद्वारे निर्दशनास आणून दिले आहे.

**गुन्हेगारांकडून चोरीच्या गुन्ह्यांत वापरुन झालेली वाहने याठिकाणी उभी ठेऊन, पळून जाण्याचा धोका जास्त आहे.**

दरम्यान, ठाणे महानगरपालिकेच्या वतीने, तीन हात नाका ते माजिवडा जंक्शनपर्यंतच्या सेवा रस्त्यावर सुरु करण्यात येणाऱ्या, **दुसऱ्या टप्प्यातील प्रस्तावित मोफत वाहनतळामुळे ठाणे शहरातील बेशिस्त पार्किंगमुळे, वाहतूक कोंडी काहीप्रमाणात जरी कमी होणार असली तरी, सदर वाहनतळातील गाड्यांसंदर्भातील निकष अद्याप महापालिका प्रशासनाने जाहीर केलेले नाहीत. सर्वप्रथम ते आधी जाहीर करावेत, अशी मागणी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने करण्यात आली आहे. याचे महत्त्वाचे कारण असे की, ठाणे शहरातील सर्वसामान्य करदात्या वाहनधारकांसाठी उपलब्ध असणाऱ्या या वाहनतळाचा गैरफायदा, जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करणारे दुकानदार, आपली वाहने, या मोफत वाहनतळात बिनदिक्कतपणे उभी करीतच आहेत. या प्रकारात समाजकंटकांचा सहभाग मोठ्याप्रमाणात असू शकतो.** चिंताजनक बाब म्हणजे, गुन्हेगारांकडून चोरीच्या गुन्ह्यांत वापरुन झालेली वाहने याठिकाणी उभी ठेऊन, पळून जाण्याचा धोका जास्त आहे. शिवाय या परिसरात गाड्यांचे शो-रुम आहेत, त्यांचीही वाहने याठिकाणी फुकटात उभी ठेवली जातात. परिणामी, वाहने नक्की कुणाची आणि ते कसे कळणार? याचाही विचार ठाणे महापालिका आयुक्त आणि वाहतूक उपायुक्तांनी करावा, अशी मागणी करीत, महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, सेवा रस्त्यावरील मोफत वाहनतळाच्या या उपक्रमामुळे, समाजकंटकाना आपल्यावर कारवाई होणार नाही, याची शाश्वती मिळाल्यासारखेच आहे. त्याचबरोबर, जुन्या वाहनांची विक्री करणारे, शो-रुमचालक आणि अनधिकृत गॅरेजचालक यांच्यासोबत, ठाणे महापालिकेचे संबंधित अधिकारी आणि वाहतूक शाखेचे अधिकारी यांच्याकडून अशा समाजकंटकांशी आर्थिक हितसंबंध जोपासले जाण्यास वाव आहे. मध्यंतरीच्या काळात, ज्युपिटर हॉस्पिटलशेजारच्या पार्किंग प्लाझाचे, मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात रूपांतर करण्याचा घाट, ठाणे महानगरपालिकेमार्फत घातला जात असल्याचे वृत्त प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झाले होते. त्यासंदर्भात 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, दि. ०८/०४/२०२३ रोजी, पत्र (धराप/मनपाआ/ठामपा/ठाणे/२०२३/२३) सादर करुन, ज्युपिटर हॉस्पिटलशेजारील पार्किंग प्लाझाचे, रुग्णालयात रूपांतर न करणेबाबत या आशयानुरुप, आपला विरोध दर्शविला होता. तरी, ठामपा प्रशासनाने संबंधित सेवा रस्त्यावरील प्रस्तावित मोफत वाहनतळाबाबत, गांभीर्याने पाऊले उचलत, आपले निकष त्वरित जाहीर करावेत, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्रात शेवटी केली आहे.

## ठाणे पोलीस वाहतूक शाखा व खाजगी टोईंग एजन्सीजच्या 'गुन्हेगारी-संगनमता'ने राजरोस चाललेल्या करोडो रुपयांचा आर्थिक महाघोटाळ्याचा पर्दाफाश...

'धर्मराज्य पक्षा'चे संघटक अजय जया यांनी माहिती अधिकाराच्या सहाय्याने ठाणे शहरातील पोलीस वाहतूक शाखा व खाजगी टोईंग एजन्सीजच्या संगनमताने शासकिय तिजोरीत पुरेपूर भरणा न होताच, परस्पर होणाऱ्या 'आर्थिक-लुटीचा महाघोटाळा' उघडकीस आणलेला आहे!

ठाणे शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी म्हणून ठाणे शहरात टोईंग व्हॅनचा सर्रास वापर गेली काही वर्षे करण्यात येत असून, यासाठी खाजगी 'टोईंग व्हॅन'वाल्यांना पोलीस प्रशासनाकडून (पोलिस उपायुक्त... DCP) यांनी प्रत्येक गाडी 'टो' करण्यासाठी प्रति गाडी २०० घेण्याची परवानगी दिलेली आहे. यात टोईंगवाल्यांनी त्यांच्या कर्मचार्यांचा पगार, डिझेल, गाडीचा हप्ता आणि मेंटेनन्स इ. सर्व खर्च भागवायचा, असे ठरलेले आहे.

पण, माहिती अधिकारातून एक धक्कादायक माहिती पुढे येत आहे, ती अशी की, वागळे प्रभागातील वाहतूक शाखेतून १ मार्च २०२३ ते १० एप्रिल २०२३ दरम्यान एकूण ९८१ वाहनांवर टोईंगची कारवाई करण्यात आलेली आहे.

आता, वागळे वाहतूक शाखेच्या अखत्यारीत एकूण ४ टोईंग व्हॅन्स आहेत.

९८१ × ४ = २४६ (म्हणजेच, प्रत्येक टोईंग व्हॅनने सरासरी २४६ गाड्यांना या कालावधीत 'टो' केलेले आहे.)


२४६ × ४१ (१ मार्च २०२३ ते १० एप्रिल २०२३ एकूण दिवस) = ६ केले तर, सरासरी फक्त ६ गाड्यांवर दिवसागणिक कारवाई करण्यात आलेली आहे, असं आपल्या निर्दशनास येतं.

२०० ु ६ = १२०० एका टोईंग व्हॅनची दिवसाची मिळकत होत असेल; तर, त्यात त्यांना कर्मचार्यांचा पगार, डिझेल, गाडीचा मेंटनन्स, गाडीचा हप्ता इ. खर्च भागविणे शक्य तरी आहे का?

प्रत्यक्षात मात्र, १ टोईंग व्हॅन दिवसागणिक सरासरी ४० ते ४५ गाड्या टो (Tow) करताना दिसून येत आहे.

म्हणजेच, **अनेक गाड्यांच्या दंडाच्या पैशाचा शासकिय तिजोरीत भरणाच केला जात नसून मधल्या मध्येच, हे पैसे पोलीस व टोईंग व्हॅन वाल्यांकडून लंपास केले जात असावेत, अशी अतिशय धक्कादायक बाब व रास्त शंका याप्रकरणी उपस्थित झालेली आहे... तेव्हा, या सार्वजनिक-भ्रष्टाचाराच्या सकृतदर्शनी गंभीर प्रकरणाची तातडीने खोलवर निःपक्षपाती चौकशी केली जाण्याची मागणी 'धर्मराज्य पक्षा'ने केलेली आहे.**

**पोलीस प्रशासनाकडून ठाणे शहरातील नागरिकांची होणारी ही आर्थिक लूट / फसवणूक (महाघोटाळा) उघड करण्याचं धारिष्ट्य फक्त आणि फक्त, 'धर्मराज्य पक्षा'सारख्या नितीमान राजकीय पक्षाकडेच असू शकतं... अन्य 'सेटिंगबाज' राजकीय पक्षांकडून असल्या अपेक्षा बाळगणं, म्हणजे बैलाकडून दुधाची अपेक्षा बाळगणं होय, असं या संबंधात जाणकार ठाणेकर नागरिक उघडपणे मतप्रदर्शन करताना दिसतायत.**



# ठाणे शहरातील वाहतुकीच्या बदलांबाबत, 'धर्मराज्य पक्षा'च्या वाहतूक शाखेला धोरणात्मक सूचना

**ठाणे (प्रतिनिधी) :** ठाणे शहरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी, वाहतूक शाखेने, प्रायोगिक तत्त्वावर वाहतुकीत बदल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सुरुवातीला वर्तुळाकार होणाऱ्या बदलामध्ये व्यापारी आणि स्थानिकांच्या विरोधानंतर आता, वाहतूक शाखेने मल्हार सिनेमावरुन, तीन हात नाका येथे जाण्यासाठी, एकेरी व तीन हात नाका येथून दमाणी इस्टेट मार्गे, हरिनिवास चौकात जाण्यासाठी, वाहतूक एकेरी करण्याचा निर्णय घेतलेला आहे; तर, हरिनिवास चौक ते नौपाडा चौक हा, दुहेरी मार्ग असणार आहे. तसेच, आराधना सिनेमा परिसरात दुभाजक बसविण्यात येणार आहे. सदर बदलांविषयीची तारीख अद्याप निश्चित करण्यात आली नसल्याची माहिती, वाहतूक शाखेकडून देण्यात आलेली आहे. या बदलांमुळे, तीन हात नाका, हरिनिवास चौक, मल्हार सिनेमा आणि तीन पेट्रोल पंप भागात होणाऱ्या



वाहतूककोंडीतून चालकांची सुटका होण्याची शक्यता असल्याचे, ठाणे वाहतूक शाखेचे म्हणणे आहे. दरम्यान, ठाणे शहरातील, विशेषतः नौपाडा परिसरातील गर्दीच्या ठिकाणी होणारी वाहतूकोंडी सोडविण्यासाठी, वाहतूक शाखेच्या माध्यमातून वाहतुकीत बदल करण्याचा जो काही निर्णय घेण्यात आलेला असला तरी, यामुळे बेशिस्त वाहन चालकांवर, खास करुन रिक्षाचालकांवर चाप बसणार आहे का? असा प्रश्न यामाध्यमातून उपस्थित होत असून, 'धर्मराज्य पक्षा'ने केलेल्या निरीक्षणानुसार, केवळ प्रायोगिक तत्त्वावर वाहतुकीत बदल करुन, वाहतूककोंडी सुटणार नाही; तर, बेशिस्त वाहनचालक, विशेषतः रिक्षाचालकांवर शिस्तभंगाची कारवाई होणे क्रमप्राप्त आहे. मात्र, वाहतूक शाखेकडे आधीच अपुरे मनुष्यबळ आणि कर्मचाऱ्यांची वानवा असल्याने, तूर्तास तरी, वाहतूककोंडीच्या समस्येवर लागलीच तोडगा निघणे कठीण आहे, याची प्राधान्याने दखल घेऊन, पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, वाहतूक शाखेच्या उपायुक्तांना पत्राद्वारे काही धोरणात्मक सूचना केल्या आहेत.

ठाणे शहरातील बेसुमार वाहतूकोंडीचा त्रास कमी व्हावा यासाठी, वाहतूक शाखा ठराविक कालावधीनंतर, वाहतुकीत प्रायोगिक तत्त्वावर बदल करीत असते. हा बदल यशस्वी ठरला तरच, त्याला अंतिम स्वरुप दिले जाते. मात्र, नो-पार्किंगमध्ये उभ्या केलेल्या वाहनांखेरीज, बेशिस्तपणे नो-एन्ट्रीतून प्रवेश करणाऱ्या वाहनांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली शक्यतोवर आढळून येत नाही. ठाणे शहरातील सर्वाधिक रहदारीचा रस्ता म्हणून, राममारुती रोड, विष्णुनगर रस्ता, घंटाळी चौक रस्ता आणि गोखले रोड हे मार्ग ओळखले जातात. संध्याकाळच्या ऐन वर्दळीच्या वेळी तर, स्वीट कॉर्नरसमोर गोखले रोडवरुन दुचाकीस्वार थेट उजवीकडे राममारुती रस्त्याकडे वळण घेत असल्यामुळे, या रस्त्याने डावीकडे ठाणे रेल्वे स्टेशन आणि उजवीकडे मल्हार सिनेमाच्या चौकात जाणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होऊन, प्रचंड वाहतूककोंडी होते, याकडे 'धर्मराज्य पक्षा'ने वाहतूक उपायुक्तांचे लक्ष वेधले आहे. त्याचप्रमाणे गावदेवीवरुन लोकमान्य नगर व वागळे इस्टेटसाठी निघणाऱ्या रिक्षा, राममारुती रोडमार्गे बडोदा बँकेच्या शेजारुन उजवीकडे वळण घेत, घंटाळी चौकातून सरळ पुढे जात, साईबाबा मंदिरावरुन तीन पेट्रोल पंपावरुन जाणे अपेक्षित असताना, रिक्षाचालक राममारुती रोडवर येऊन, थेट संभाजी पथावरुन नो-एंट्रीतून प्रवेश करतात. यामुळे बडोदा बँकेच्या शेजारुन, डॉ. वाघोळकर हॉस्पिटल ते घंटाळी चौक, हा अवघा १५० मीटरचा एकदिशा मार्ग पूर्णपणे ब्लॉक होऊन जातो. *...(पान क्र. ११ वर)*

## अनधिकृत झोपड्यांवर कारवाई करण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी... *(पान क्र. १ वरुन)*

घटना ताजी असली तरी, **घोडबंदर रोडवरील काजूपाडा येथील, अनधिकृत झोपड्यांवर मात्र, राजकीय वरदहस्तामुळे कारवाई होत नसल्याची चर्चा, संपूर्ण ठाणे शहर आणि घोडबंदर रोडवरील परिसरात चर्चिली जात आहे. मुळात, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आशीर्वादानेच, भूमाफिया अशाप्रकारच्या अनधिकृत झोपड्या उभारत असतात. याच झोपडयांना नंतर, वीज कनेक्शन व पाणीपुरवठा करुन, त्यांना शासकीय अभय दिले जाते. भविष्यात पुनर्विकासाच्या नावाखाली या अनधिकृत झोपड्यांना इमारतीमध्ये पक्की घरे दिली जातात. यामाध्यमातून, स्थानिक लोकप्रतिनिधी आपली व्होट-बँक तयार करीत असतात. शासकीय भूखंडावर अतिक्रमण करुन, अनधिकृत झोपडपट्टी उभारुन, पुढच्या काळात करदात्या नागरिकांच्या पैशांतूनच त्याठिकाणी इमारती उभारल्या जातात. संतापजनक बाब म्हणजे, यामध्ये शंभर टक्के परप्रांतीयांच्याच झोपड्या असतात.** अशा परराज्यातून आलेल्या लोकांच्या एकगठ्ठा मतदानावर डोळा ठेऊन, त्यांना आधारकार्ड आणि रेशनिंग कार्ड या सुविधा पुरवून, महाराष्ट्र राज्याचे अधिकृत नागरिक बनवले जाते, हा आतापर्यंतचा दुर्दैवी राजकीय इतिहास आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शासकीय कृपेने व राजकीय आशीर्वादाने, अनधिकृत झोपडीच्या माध्यमातून, अधिकृतरीत्या मिळालेली इमारतीमधील पक्की घरे, विकून किंवा भाडेतत्त्वावर देत, त्यातील अनेक परप्रांतीय नागरिक, आणखी एका मोकळ्या भूखंडाचा शोध घेऊन, पुन्हा नवीन झोपडपट्टी निर्माण करतात. गेली कित्येक वर्षे असंच चक्र सुरु असून, त्यात मूळ स्थानिक भूमिपुत्र आणि करदाता-कष्टकरी नागरिक मात्र, सामाजिकदृष्ट्या पूर्णतः भरडला जाऊन आपले अस्तित्व गमावून बसतो. शिवाय, यामुळे स्थानिक प्रशासन व राज्य शासनावर आर्थिक बोजा पडतो तो वेगळाच. याला सर्वस्वी राजकीय उदासीनता कारणीभूत तर आहेच, त्याचबरोबर एकगठ्ठा मतं मिळविण्याच्या उद्देशाने, स्वतःचा मतदारसंघ आपल्यासाठी आणि आपल्या वारसदारासाठी कायमस्वरुपी सुरक्षित राखण्यासाठीच केलेली ही राजकीय धडपड असल्याचा आरोप 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने करण्यात आला आहे.

दरम्यान, ठाणे शहराला लाभलेल्या गर्द हिरवाईने नटलेल्या डोंगररांगांवर, दिवसेंदिवस मोठ्याप्रमाणात अतिक्रमणे करुन, घरे उभारण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात दरडी कोसळून, अनेक नागरिक मृत्युमुखी पडल्याच्या घटना याआधी घडलेल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर, **'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, ठाणे जिल्हाधिकारी, ठाणे महानगरपालिका आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त, वनविभाग आणि ओवळा-माजिवडा विधानसभेचे आमदार प्रताप सरनाईक यांना पत्र लिहून, याप्रकरणी ठोस पाऊले उचलण्याची आग्रही मागणी केलेली आहे. काजूपाड्याचा हा परिसर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अखत्यारीत येत असल्याने, वन्यप्राण्यांचा मूळ अधिवास असलेल्या भूभागात झालेले हे मानवी अतिक्रमण असून, त्यांचे अस्तित्व धोक्यात तर येईलच; परंतु, त्याचबरोबर मानव आणि वन्यजीव यांच्यात संघर्षही निर्माण होईल, अशी भीती पत्राद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.** पावसाळ्यात डोंगर खचून अथवा दरड कोसळून, निरपराध नागरिकांचे बळी जाऊ नयेत म्हणून, ठाणे वनविभागाने मागील दहा-पंधरा दिवसांपूर्वी, कळवा-पारसिक डोंगराच्या परिसरातील कारगिल कोंडा येथील, सुमारे ५७८ अतिक्रमणांवर कारवाई करीत, वनजमीन अतिक्रमणमुक्त केली आहे. याचपद्धतीने, प्रशासनाने अनधिकृत झोपड्यांवर अंकुश ठेवल्यास, फक्त स्थानिक परिसरच नव्हे; तर, अवघा महाराष्ट्र खऱ्या अर्थाने सुरक्षित राहील, याची गंभीरपणे नोंद घेऊन, घोडबंदर रोडवरील काजूपाडा येथील, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पायथ्याजवळील परिसरात वाढलेल्या अनधिकृत झोपड्या तात्काळ निष्कासित कराव्यात आणि याप्रकरणाची सखोल चौकशी करुन, संबंधित दोषी व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि सदरहू कारवाईसंदर्भात आम्हाला लेखी अवगत करावे, अशी आग्रही मागणी महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, आपल्या पत्राद्वारे शेवटी केली आहे.

# ''धर्मराज्य पक्ष आणि धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघात आलात... आता, 'राजन राजे' हा पंचाक्षरी मंत्रच तुम्हाला तारु शकतो!''

## वसईच्या 'स्टेलमेक लिमिटेड' कंपनीच्या कामगार सदस्यांना राजन राजेंनी केले आश्वस्त...





**पालघर : ''कायम कामगार असलात तरी, तुमची किंमत शून्य आहे. कोण विचारतोय कामगारांना? मातीला भाव आहे; पण, कामगारांच्या जगण्याला किंमत नाही. अवघा अकरा हजार रुपये पगार? शरम वाटली पाहिजे तुम्हाला, हे काय कुत्र्याला टाकलेले तुकडे आहेत का? व्यवस्थापनाच्या अन्याय–अत्याचाराला आपण 'रक्तपिपासू शोषक व्यवस्था' असा शब्द वापरतो का? कंपनी दहशतवादाबद्दल आपण कधी बोलतो का? डोळेझाक का करताय... कुठे गेले तुमचे धर्मसंप्रदायवाले नेते? राजकीय नेते तर, बदमाश आहेतच; पण, धर्मसंप्रदायवाले बाबा–महाराज आणि बापू तुम्हाला मानसिक, वैचारिक षंढ बनवतात!'' अशा कठोर व रोखठोक भाषेत 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे संस्थापक–अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, वसई येथे सोमवार, दि. १५ मे–२०२३ रोजी, कामगारांना मार्गदर्शन केले.** पालघर जिल्ह्यातील,

> 'धर्मराज्य पक्ष हा, महात्मा गांधींची मूल्ये जपणारा पक्ष आहे. ते आमचं फक्त धोरणच नव्हे; तर, आम्ही ते आमच्या रक्तात उतरवलेलं आहे... पण, त्याचवेळी आमच्या वृत्तीत भगतसिंगही आहे.

वसई तालुक्यात असणाऱ्या 'स्टेलमेक लिमिटेड' (मु. उसगाव, पो. भाताणे) या कंपनीच्या कामगारांना मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सभेत बोलताना मा. राजन राजे पुढे म्हणाले की, ''फ्रान्समध्ये राज्यक्रांति झाली म्हणून, आज तुम्ही उरल्यासुरल्या लोकशाहीचा अनुभव तरी घेताय... याआधी भारतात जी काही लोकशाही अस्तित्वात होती ती, या मोदी–शाहांनी संपवली, राज्यघटना तर त्यांनी बासनातच गुंडाळली. आता तर त्यांच्याच पुढाकाराने 'कंत्राटी–**कामगार' नावाची गुलामगिरी, नव–अस्पृश्यता सुरु झालीय. भारतात बुद्धिमत्तेची बिलकुल कमतरता नाहीये, भारतात उत्पादनही प्रचंड होते... बुद्धिमत्तेचं उदंड पीक आहे; मात्र, चांगली 'बुध्दी' असणाऱ्यांचा फार मोठा तुटवडा आहे, फार मोठी कमतरता आहे. प्रस्थापित राजकारणी आणि धनदांडग्या, भांडवलदारी प्रवृत्तीने या महाराष्ट्र देशातील कामगार–चळवळ संपवली... होय, माझ्यासाठी महाराष्ट्र हा 'देश' आहे. म्हणूनच मी, 'स्वायत्त–महाराष्ट्रा'चा पुकार करतो. 'संयुक्त महाराष्ट्रानंतर आता, स्वायत्त महाराष्ट्र... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, स्वायत्त–महाराष्ट्र... शिवछत्रपती राष्ट्र!' हा माझा संदेश आहे!'' अशा आपल्या ओघावत्या भाषणशैलीतून, मा. राजन राजे यांनी, उपस्थित कामगारांच्या धमन्यांतून 'महाराष्ट्र–धर्मा'चे रक्त चेतवले.**

दरम्यान, स्टेलमेकच्या कामगार सदस्यांना संबोधित करताना मा. राजन राजे पुढे म्हणाले की, ''धर्मराज्य पक्ष हा, महात्मा गांधींची मूल्ये जपणारा पक्ष आहे. ते आमचं फक्त धोरणच नव्हे; तर, आम्ही ते आमच्या रक्तात उतरवलेलं आहे... पण, त्याचवेळी आमच्या वृत्तीत भगतसिंगही आहे. लक्षात ठेवा, जर तुम्ही आमच्यावर अन्याय–अत्याचाराचा कहर माजवलात, आमचे जगण्याचे सगळे मार्ग खुंटवलेत, आम्हाला गुलामगिरीत ढकललंत, आमचा प्रतिकार तुम्ही जबरदस्तीने मोडून काढलात, तर मग आम्हाला भगतसिंग होण्यावाचून पर्याय राहणार नाही. **आपल्याला 'भगतसिंगां'ची प्रतिमा कामगारांनी भेट दिल्याचा संदर्भ घेत ते पुढे म्हणाले की, ''गावपाड्यातील आमच्या आयाबहिणींनी आता छा छू करणारे 'भगत' जन्माला घालणं बंद केलं पाहीजे आणि अन्याय–अत्याचार–शोषणाविरुद्ध लढणारे 'भगतसिंग' जन्माला घातले पाहीजेत.'' कामगार नावाचा हा 'धर्म' आहे. तुम्ही आता 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'सोबत आलेला आहात, या राजन राजेसोबत आला आहात, तेव्हा विश्वास ठेवा, 'राजन राजे' नावाचा पंचाक्षरी मंत्रच तुम्हाला तारु शकतो. मात्र, त्यासाठी तुमच्यात शंभर टक्के एकजूट हवीय.** ...*(पान क्र. १५ वर)*



ग्रंथाली प्रकाशन आणि सुनील कर्णिक मित्र–परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने, वाचनकट्टा अंतर्गत, ज्येष्ठ लेखक–पत्रकार व संपादक सुनील कर्णिक यांच्या, ''स्वतःखेरीज सर्वकाही'' या गौरवग्रंथाचे प्रकाशन आणि त्यांचा सत्कार सोहळा, मराठी ग्रंथ–संग्रहालय, ठाणे येथे शनिवार, दि. २४ जून–२०२३ रोजी, आयोजित करण्यात आला होता. यावेळी, ''आजचा खरा–खोटा मराठी साहित्य व्यवहार'' या विषयावर रोखठोक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात, राज्यसभा खासदार श्री. कुमारजी केतकर व झुंजार पत्रकार निखिल वागळे तसेच श्रीकांत बोंजेवार, प्रा. विजय तपासे, कवियित्री–लेखिका नीरजा आणि उत्सवमूर्ती सुनील कर्णिक यांनी सहभाग घेतला होता. दरम्यान, या साहित्य–सोहळ्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे हे विशेष निमंत्रित होते. यावेळी सुनील कर्णिक यांचे, मा. राजन राजे यांनी पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक अभिनंदन करुन, त्यांच्या साहित्यसेवेसाठी अनेक शुभेच्छा दिल्या.

# इतना सन्नाटा क्यूँ है भाई ???

# ‘मन की बात’ नहीं... ‘मणिपूर की बात’ करो !!!


**हिंडेंनबर्ग-अहवालानुसार हजारो-लाखो कोटींचा गौतम अदानींचा कथित महाघोटाळा उघडकीस आला... आपण तरीही, ‘मौनीबाबा’च?**

**माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी पुलवामा-हत्याकांड आणि बालाकोट-स्ट्राईकची ‘पोलखोल’ केली... तरीही, आपण तोंडात मिठाची गुळणी घेऊनच?**

**महाराष्ट्राच्या राज्यपालांनी घटनाबाह्य बेजबाबदार वर्तन केलंय, असे सर्वोच्च न्यायालयाने कडक ताशेरे झाडले... तरीही, आपलं ‘मौनव्रत’ चालूच?**

महिला-पहिलवानांनी गुन्हेगारीवृत्तीच्या भाजपा खासदार ब्रिजभूषणवर, लैंगिक-शोषणाचे गंभीर आरोप लावले... तरीही, ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’, असं म्हणणारे आपण अजून चिडीचूपच?

शेकडो बळी घेणारा बालासोर रेल्वे-अपघात झाला... तरीही, गुजराथच्या मोरबी-पूल दुर्घटनेच्या वेळेप्रमाणेच आपण ‘मौन’ पाळलेलं... दोन्ही अपघात एकतर भयानक भ्रष्टाचारातून




किंवा सुरक्षिततेबाबत अक्षम्य तडजोड केल्यामुळेच घडलेले असतानाही, कोणी ‘बडा’ असामी जबाबदार धरला जाऊ नये... ‘याजसाठी चाललाय का, हा ‘मौना’चा अट्टाहास’?

आणि, आता मात्र तर, कहरच झाला... मणिपूरमध्ये शेकडो लोकं मारली जातायत, हजारो घरं जाळूनपोळून नष्ट केली जातायत... निवडणुकीच्या वेळेस सोयिस्कररित्या ‘व्हॅली-सरकार’ म्हणून, प्रचार करत स्वतःचीच पाठ थोपटून घेणाऱ्या केंद्र-सरकारला, हे आता ठामपणे सांगायला हवं की....

**''महिनों से जल रहा है ‘मणिपूर’, सैकडों लोग मर रहे है... क्यूँ उसे बचाने की क्षमता आप नहीं रखते? मणिपूर का जलना, ये किसकी ‘राजनैतिक ख्वाईश’ है?? मणिपूर-चुनाव के दरमियान खुदको पूर्वोत्तर सीमा सुरक्षित रखनेवाली (जब की चीन ने हमारे बडे भूभागपर कब्जा बना लिया है) तथा उसे पूरे भारतवर्ष से जोडनेवाली ‘व्हॅली-सरकार’ कहलवाने वाले, मणिपूर जाने की हिमत क्यूँ नहीं रखते, वहाँ की हिंसा क्यूँ नहीं रुकवा सकते??? ये ‘व्हॅली-सरकार’ है, या हिमत से ‘खाली-सरकार’????''**

अरे, या देशात ‘पंतप्रधान’ मौजूद आहेत की, नाही? ‘मौनीबाबा’ म्हणून नाहक हिणवले... *(पान क्र. १३ वर)*

## कंत्राटी-कामगारपद्धतीतल्या गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेमुळे आणि आईवडिलांच्या तुटपुंज्या पगारामुळे, बालकामगारांची संख्या बेसुमार वाढत चाललीय!

### जागतिक बालकामगार-विरोधी दिनानिमित्त, ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांचे रोखठोक प्रतिपादन




**मुंबई (प्रतिनिधी) :** जागतिक बालकामगार-विरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाअंतर्गत, कामगार-आयुक्तालयाने, दि. १२ जून २०२३ रोजी आयोजित केलेल्या ऑनलाईन-बैठकीदरम्यान घेण्यात आलेल्या स्वाक्षरी-मोहिमेत, ‘धर्मराज्य पक्ष’ आणि ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी, विशेष सहभाग घेतला होता. यासंदर्भातील, बैठकीत बोलताना राजन राजे म्हणाले की, बालकामगार, ज्या कारणांमुळे मोठ्याप्रमाणावर निर्माण होतात... त्या कारणांच्या मूळावर जाऊन कामगार-आयुक्तालयाने प्रहार करायला हवा. आमच्या लहानपणी आमच्या वडीलांच्या पगारात बऱ्यापैकी भागत होतं; तर, अलिकडच्या काळातील संपत्तीच्या अतिकेंद्रीकरणामुळे, अमानुष आर्थिक-विषमतेमुळे संसाराचा गाडा ओढणं, ही गोष्ट आईवडील दोघंही नोकरी करुनही अवघड होत आहे. भरीसभर म्हणून ‘कंत्राटी-कामगार पद्धती’तल्या गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेमुळे आणि आईवडिलांच्या तुटपुंज्या पगारामुळे बालकामगारांची संख्या बेसुमार वाढत चाललीय. त्यावर, ‘मूले कुठारः’ असा मूलभूत इलाज व्हायला हवा... कंत्राटी-कामगार पद्धतीचं समूळ उच्चाटन, हे व्हायलाच हवं! असे रोखठोक प्रतिपादन राजन राजे यांनी यावेळी बोलताना केले.



प्रसारमाध्यमातून साभार

सुल्झर पंप्सचे निष्ठावान कामगार व ‘धर्मराज्य पक्षा’चे धडाडीचे कार्यकर्ते खारीगावचे श्री. सुरेश म्हात्रे यांच्या ५३ व्या वाढदिवसानिमित्त दि. १६ जून-२०२३ रोजी ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे आवर्जून उपस्थित राहीले व त्यांनी सुरेशचे व्यक्तिशः व समस्त म्हात्रे-परिवाराचे अभीष्टचिंतन केले... त्याप्रसंगीची काही क्षणचित्रे.





# नकोत आम्हा एलिऑन मस्क, नकोत बिल गेट्स... हवेत आम्हा 'गांधी महात्मा' आणि 'गुरुजी साने'!

**मानवजातीच्या अंतिम कल्याणासाठी 'ओशों'सारखा प्रबुद्ध पुरुष, प्रचलित शिक्षणपद्धतीवर टीका करत, ''पुरुषांनी स्त्रीसारखं प्रेम, 'ममत्व' अंगी बाणवण्याची नितांत गरज असताना, आपल्या स्पर्धात्मक व गणित-सायन्सवरच भर देणाऱ्या शिक्षणपद्धतीमुळे स्त्रियाच पुरुषांसारख्या कडव्या महत्त्वाकांक्षी म्हणून संवेदनशून्य होऊ लागल्याची'' तीव्र चिंता व्यक्त करुन गेले; तर, दुसरीकडे 'कोसला'कार ज्ञानपीठ-पुरस्कार विजेत्या भालचंद्र नेमाडेंच्या कवितेतल्या स्त्रिया, ''पुरुषांना, स्त्रियांसारख्या बाळंतपण, दुग्धपानाच्या जबाबदार्या देणारे शोध लावा रे'' म्हणत टाहो फोडतात..... त्या सार्याचा अर्थ एकच, तो म्हणजे, ''समाजातलं हळवेपण, सहसंवेदनांचे पंख मिटत चाललेत आणि व्यावसायिक अथवा राजकीय यशासाठी क्रौर्यपूर्ण शोषक, अन्याय-अत्याचारी प्रवृत्ती उघड्यानागड्या स्वरुपात 'कायदेशीर नंगानाच' घालू लागल्यात... ज्याला 'व्यावसायिकता' अथवा 'प्रोफेशनलॅलिझम' नावाचं गोंडस लेबल वर बेमालूम चिकटवलं जातंय!''**

केवळ, पर्यावरणीय महासंकटकाळ आलाय उंबरठ्यावर म्हणून नव्हे; तर, तो येवो न येवो (तो येणारच, हे त्रिवार सत्य)... ममता, कारुण्य, भूतदया, माणुसकी या सद्गुणीवृत्तींवर चालणाराच मानवी-व्यवहार कुठल्याही युगात, कुठल्याही स्थितीत हवा... या सद्गुणांनी बहरलेलीच मानवी-संस्कृति कुठल्याही किंमतीवर हवी... हेच अंतिम-सत्य होय!

पण, माणसाला आत्यंतिक स्वार्थरत व आत्मकेंद्रित बनवून अंततः अमानुष बनवणारं आणि मोजक्या हातांमधून नियंत्रित होऊ लागलेलं अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रज्ञान... जर,





सामान्य माणसांच्या जगण्याची कोंडी करुन प्राणच कंठाशी आणू लागलं तरं?

**''जीवो जीवस्य जीवनम'', हे वैश्विक सत्य, जीवनाचं आधारभूत तत्त्व असलं तरी; माणसाला कर्मबुद्धी नियतीने बहाल केलेली असल्याने, माणुसकी आणि भूतदया यावरच पूर्णतया मानवी-व्यवहार आधारलेला हवाच. त्यादृष्टीनेच, 'नैसर्गिक' शेती-व्यवहार हवा...** मांसाहारसुद्धा होता होईल तेवढा 'किमान पातळी'वर राखला जायला हवा (कायमचा त्यागता आला तर, उत्तमच), हे ही महत्त्वाचंच. शिवाय, ''Life without ambition, is a ship without rudder'', यासारखी, प्रसंगी राक्षसी-महत्त्वाकांक्षेला आणि पर्यायाने अमानवीय स्पर्धेला बालपणापासूनच खतपाणी घालणाऱ्या पाश्चात्य म्हणी, व्यवहारातून कायमच्या बाद करायला हव्यात.... जर, औषधपाणी, नशापाणी करण्याची गरज न भासता, खरोखरीच सुखसमाधाने जगायचं असेल; तर, 'गांधीबाबा आणि सानेगुरुजी' यांना दुसरा पर्याय नाही. म्हणूनच, सध्याच्या काळात 'सत्ता' खर्याअर्थाने बड्या भांडवलदारांच्या सुसंघटित गटाच्या हाती असल्याने आणि मस्क, गेट्स सारखे उएज त्यांचेच जेंडे राबवणारे 'मुखत्यार' असल्याने ठामपणे म्हणावयास हवं की, ''औषधालासुद्धा कणव व संवेदना नसलेल्या, या विकृततेकडे झुकलेल्या 'गैरबुद्धी'च्या बुद्धिमंतांच्या हाती सत्ता एकवटणं... मानवासह, संपूर्ण सजीवसृष्टीसाठी अंति घातक आहे!

**मुद्दा महत्त्वाचा हा की, ''जगात, बुद्धिमंतांची बिलकूल उणिव वा कमतरता नाही; तर, कमतरता आहे ती, चांगली व मंगल बुद्धी (अरिहंत अथवा करुणावान प्रज्ञा) असणाऱ्यांची!'' जिंकणं, हे काही विशिष्ट परिस्थिती वगळता, अजिबात महत्त्वाचं नव्हे, 'जगणं आणि जगवणं' त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक महत्त्वाचं''... हा म. गांधी, सानेगुरुजींसारख्या सत्प्रवृत्तींचा त्रिकालाबाधित संदेश आहे... कारण, जिंकणं, कुणाचा तरी पराभव करुन घडतं आणि अनेकप्रसंगी ''राक्षसीप्रवृत्ती, या सत्प्रवृत्तींविरुद्ध संसाधनांचा बेलगाम गैरवापर, दडपशाही, फसवेगिरी, षडयंत्रांच्या बळावर जिंकताना... या भांडवली जगतात, मानवी जगण्याच्या व्यवहारातील अनेकोनेक क्षेत्रात फार मोठ्याप्रमाणावर हरघडी दिसतात!''** त्यामुळे, ''बळी, तो कानपिळी'' हा सैतानीउन्माद थैमान घालायला लागलाय.

म्हणूनच, कुणाचंही 'मूकआक्रंदन, आत्म्यांची तडफड' बुडाखाली झाकून ठेवलेलं नसलेलं... ''प्रज्ञा, शील, करुणा, दया, क्षमा, शांति, अरिहंत'' या महान तत्त्वांनी व्याप्त मानवी-जगणं हवं असेलं... तर आणि तर, म. गांधी, सानेगुरुजीच हवेत... अमानुष स्पर्धेच्या जोखडात आयुष्य बांधून ठेवणारे, आयुष्याच्या प्रत्येक पावलावर...***(पान क्र. १३ वर)***

---

# ''दिव्याखाली दिसतसे अंधार....''

**('जागतिक-तापमानवाढी'चा अनिवार्य विध्वंसक परिणाम म्हणून... Climate Change किंवा बदलत्या हवामानानुसार 'मौसम' बदलत रहाणाऱ्या नैऋत्य मोसमी-पावसाच्या विलंबाच्या पार्श्वभूमीवर...)**

महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न गोवा आणि हरयाणा पाठोपाठ देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे; पण, ते प्रामुख्याने औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या योगदानामुळे (महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कृषिप्रधान असूनही)... तसेच परकीय गुंतवणुकीबाबत महाराष्ट्र दुसर्या क्रमांकावर आहे. पण, ग्रामीण पायाभूत सुविधांबाबत महाराष्ट्र देशात पहिल्या दहात सुद्धा नाही. याबाबत, उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या तथाकथित मागास राज्यांनी प्रयत्नपूर्वक आपल्याला केव्हाचंच मागे टाकलंय.

भारतीय कृषिसिंचन-सरासरी जवळपास ४६% आहे. तर, महाराष्ट्रातील फक्त १८% लागवडीखालील जमीन सिंचनाखाली येते. पंजाब (९८%), हरयाणा (९०%), उत्तर प्रदेश (६०%) अशी, या राज्यांमधील जमीन कृषि-सिंचनाखाली येते. फक्त, केरळ राज्यच काय ते आपल्या मागे म्हणजे १५% वर आहे... आणि, हे सगळं तेव्हा घडतंय जेव्हा, महाराष्ट्रात, भारतातील सर्वात जास्त म्हणजे, एकूण १८४५ धरणं (भारतातल्या मोठ्या धरणांपैकी एकूण ३५% धरणं महाराष्ट्रात आहेत) आणि सर्वात जास्त काळ केंद्रीय कृषिमंत्री, हे महाराष्ट्रातून गेलेले आहेत (त्यात, स. का. पाटीलांच्या १९५९ ते १९६३ या चार वर्षांच्या केंद्रीय कृषिमंत्रीपदाच्या कार्यकाळानंतर, शरद पवार हेच भारतात सर्वात जास्त काळ म्हणजे, २००४ पासून ते २०१४ पर्यंत एकूण १० वर्षे केंद्रीय कृषिमंत्री होते).

कागदोपत्री आपली सिंचनक्षमता नेहमीच मोठी फुगवून दाखवली जाते; पण, जमिनीवर मात्र, शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो आणि कवी यशवंत मनोहरांच्या काळजाला भिडणाऱ्या शैलीत, ''कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही; सदरहू पीक आम्ही आसवांवर काढलेलं आहे'', असं डोळ्यात प्राण आणून शेतकऱ्यांना तडफडून सांगावं लागतं... लाखो शेतकरी हवालदिल असण्याचं आणि त्यांच्या मोठ्याप्रमाणावर आत्महत्या घडण्याचं, ते एक प्रमुख कारण आहे.

कुठल्या शुक्राचार्यांच्या 'झारीतल्या डोळ्यां'नी मायमराठी शेतकऱ्यांचं पाणी, आजवर अडवून धरलेलं आहे आणि कृषिसिंचनासाठीच्या आजवरच्या हजारो-लाखो करोडोंच्या तरतुदीला कुठले कुठले पाय फुटलेत... याचं रहस्योद्घाटन कधि होणार???

ईडी, सीबीआय, आयटी वगैरे केंद्रीय-यंत्रणांना जर... ''भाजपाविरोधी राजकारण्यांना 'भ्रष्टाचारी जोडो' या अभियानाअंतर्गत भाजपाई कळपात खेचून आणण्याच्या''... घटनात्मक नव्हे; विघटनात्मक कामातून फुरसद कधि मिळणार असेल; तर, त्यांनी यासंदर्भात 'लक्ष' घालण्यास किंवा संघ-कवायतीतील रतिबानुसार 'दक्ष' रहाण्यास हरकत नसावी!

***...राजन राजे***

***(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# कामगारांविना गाडा 'मराठी'चा ना चाले...

शिक्षित-उच्चशिक्षित पांढरपेशा मध्यमवर्गीयांनो,

आजच्या 'मराठी-दिना'निमित्ताने एक गोष्ट आपण पक्की ध्यानात घेऊया की, आज जी काही मराठी भाषा, 'जिवंत' आहे (वेड्यावाकड्या अशुद्ध स्वरुपात अथवा निव्वळ बोली-भाषेच्या स्वरुपात का होईना), त्याचं मोठं श्रेय अल्पशिक्षित कामगारवर्गाकडेच जातं!

उदाहरणार्थ, **समाजातला बहुजन कामगार, एखादी निर्जीव गोष्ट अथवा वस्तू मिळाली, याला सर्रास चुकीची किंवा अशुद्ध मराठी भाषा वापरताना वस्तू भेटली, असं म्हणतात तेव्हा, ऐकताना कानाला जरुर त्रास होतो. ही किंवा अशा गोष्टी, आजच्या 'मराठी-दिना'च्या औचित्याने सुधारण्याचा निश्चय, समस्त कामगारवर्गाने जरुर करावाच. त्यांच्या हे लक्षात येत नाही की, भेटणे या क्रियेत नजरभेट किंवा गळाभेट अध्याहृत असते; म्हणूनच ती दोन किंवा अधिक माणसांच्याच बाबतीत घडणारी क्रिया होय व त्यामुळेच 'भेटणं', ही क्रिया निर्जीव वस्तुंच्या बाबतीत होऊ शकत नाही.**

असं असलं तरी, चुकीच्या पद्धतीने उच्चारण करतानाही कामगार, जो चुकीचा शब्दप्रयोग वापरतो, तो 'म' मराठीतलाच असतो. आपण उच्चशिक्षित लोक, सर्रास प्रत्येक दोनचार शब्दागणिक जे (सुंदर, अर्थवाही मराठी शब्दांऐवजी) इंग्रजी शब्द वापरत असतो... ते कितपत योग्य आहे? व्हॉट्सप 'मेसेज', याला आपण व्हॉट्सप 'संदेश किंवा निरोप' असे मराठी शब्द वापरु नाही शकत का? कधि तरी थबकून विचार करा आणि पहा, आपण बोलता बोलता किती टक्के इंग्रजी शब्द उगीचच आपापसात बोलताना घुसडतो ते!

अशानं एकवेळ अशी येईल की, पुढच्या पिढ्यांना त्या मूळ मराठी शब्दांचाच कायमचा विसर पडेल. सकळ मराठीची कास न धरता, अशा मराठी भाषेच्या भेळ-भेसळीच्या परिस्थितीतही, आम्ही सुशिक्षित आणि सुखवस्तू मध्यमवर्ग... 'मराठी-दिना'निमित्ताने, मराठी-भाषा कौतुकाच्या संदेशांचे रतीब व्हॉट्सप आणि फेसबुकवर घालणार असू; तर मग, कमालच झाली, वारे व्वा मराठी जनहो!

**मराठी भाषेत जो मायेचा ओलावा आहे, ममत्व आहे, मोठ्यांप्रति आदर आहे... ते सारं इंग्रजीत कितपत आढळेल? भाषा आणि मानवी-संस्कृति, या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या अभिन्न असताततच. मराठी जनमानसात जे निसर्ग-पर्यावरण जपण्याचं बाळकडू शिवबा-संतांकडून, मराठी सणावारातून परंपरेनं आलंय, ते ही मूळ मराठी भाषेतूनच उद्गम पावलंय. इंग्रजीतल्या 'मॉम, पॉप'चे पॉपकॉर्न कितीही टणाटण फुटू द्या; पण, त्यांना 'आई' शब्दाचं आर्त किंवा भिजलेपण कधि येऊ शकेल? पौर्वात्य-संस्कृति म्हणून जो काही भारतीय-संस्कृतिचा गौरव होतो ना, तो खरंतरं प्रकर्षानं मराठी-संस्कृतिशीच नातं सांगणारा असतो, हे विशेष.**

सध्या, जातधर्मविद्वेषाने ग्रस्त आपल्या देशात आणि युद्धग्रस्त अवतीभवतीच्या जगभरात (नुकतीचं रशिया-युक्रेन महासंहारक युद्धानं वर्षाची सीमा ओलांडलीय) क्षुद्र स्वार्थापलिकडे... तसेच हिंसक, हिणकस राजकारणापलिकडे जाऊन मायेची रुजवात करण्याची, ममत्वाचा चौफेर शिडकावा करण्याची फार मोठी गरज आहे आणि ती करण्याची अंगभूत ताकद, केवळ मराठी भाषा आणि संस्कृती स्वतःत राखून आहे, तो मायमराठीचा प्रेमाने रसरसलेला जणू मूळ गुणधर्मच होय!

''जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूतां परस्परें जडो। मैत्र जीवांचे।।'' असं विश्वधर्माचं उत्तुंग 'पसायदान' मागणारे संत ज्ञानेश्वर काय किंवा ''खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे'', असा धर्माचा मूलभूत मंत्र, जगाच्या कल्याणाचा उद्घोष करत सांगणारे, ममत्वाचे मूर्तिमंत प्रतिक असलेले साने गुरुजी काय... या मायमराठीनेच त्यांना प्रसवलं आणि या जगाला महन्मंगल दान म्हणून दिलं!




मित्रहो, तुम्हाला खरंच मराठी जगवायचीय, मराठी भाषा शिंपल्यातल्या मोत्यासारखी हळूवार जपायचीय का?

**तर मग, लक्षात घ्या... मराठी भाषा संपली की, माणुसकीसुद्धा आपल्यातून झपाट्याने काढता पाय घेईल. आजच आणि याआगोदरच, कुंठीत झालेले प्रेमाचे झरे, आपल्यातून कायमचे आटून जातील, पुढील पिढ्या त्यांच्या आचमनावाचून तृषार्त रहातील आणि निव्वळ भोगी, विलासी आणि संवेदनशून्य बनतील... हा भविष्यातला मोठा धोका आहे.**

तेव्हा जर, या 'मराठी-दिना'निमित्ताने तुमच्या मराठी-प्रेमाला आलेला उमाळा अंतर्यामी खरा असेल... तर, तुम्ही मराठी माणूस म्हणून शक्यतेची प्रत्यंचा पूर्ण ताणून मराठीतूनच परिपूर्ण बोलण्याचा, संभाषण करण्याचा प्रयत्न करा. संपूर्ण संभाषण मराठीतूनच (शक्य तेवढे इंग्रजी प्रतिशब्द वापरण्याचा मोह टाळून) करण्याचा हा तुमचा प्रयास... सुरुवातीला काहीसा अवघड, अडचणीचा जरुर वाटेल; पण, लवकरच तो प्रयत्न, तुमच्या हाडामांसी भिनेल आणि पहाता पहाता, तुमच्या व्यक्तिमत्वाचाच एक अभिमानास्पद भाग बनेल.

यासोबतच, **एक आनुषंगिक व अतिशय महत्त्वपूर्ण सूचना ही की, प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे जो बहुजन मराठी-कामगारवर्ग, मराठीची पालखी आपल्या खांद्यावर आजवर वाहून नेत आलाय... त्याला, तुम्ही कॉर्पोरेटीय-व्यवस्थापक म्हणून, राजकारणी म्हणून किंवा सरकारी अधिकारी म्हणून काम करत असताना... 'आऊटसोर्सिंग किंवा कंत्राटी-कामगार पद्धती'तल्या गुलामगिरीतून उध्वस्त होण्यापासून व त्या चरकात पिळला जाण्यापासून वाचवणं शक्य होतंय का, ते आवर्जून पहा... त्यासाठी, अगदी ठरवून तळमळून मनापासून प्रयत्न करा. 'व्यवस्थे'त काम करताना, उघडपणे तसं काही करणं अगदीच अशक्य असेल; तर, निदान शिवछत्रपतींनी शिकवला, त्या 'गनिमीकाव्या'च्या आधाराने समस्त कामगारवर्गाला ताकद देण्यासाठी आपली बुद्धी आणि शक्ति वापरा!** किमानपक्षी, कारकीर्दीतील बढतीच्या, पगारभत्तेवाढीच्या अनैतिक मोहापायी किंवा सत्तेच्या उघड्यानागड्या नृशंस बाजारातील राजकारणात उच्चपदं मिळवण्याच्या पातकी हव्यासापोटी... आपल्याच मराठी-रक्ताघामाची 'भांडवली' भरबाजारात 'जास्तीतजास्त स्वस्तात बोली' लावण्यासाठी आणि त्यांना 'कंत्राटी-गुलामगिरी'त ढकलून त्यांचं नोकरीतलं जगणं दहशत-दडपशाहीने अस्थिर करण्यासाठी... हिरिरीने पुढाकार घेण्याचं महापातक करणं, तरी तत्काळ थांबवा!

...आणि, सर्वात महत्त्वाचं म्हणजे, मराठी कामगार-कर्मचारीवर्गाच्या म्हणजेच, पर्यायाने मराठी-भाषेच्या अस्तित्वाच्या गळ्याला नख लावणार्या... या रक्तपिपासू-शोषक 'कंत्राटी-कामगार प्रथे'ला नष्ट करण्याचं 'अभिवचन', येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत उमेदवारांकडून अथवा राजकीय पक्षांकडून घेऊनच मगच, त्यांना मतदान करा आणि या 'कंत्राटी-कामगार पद्धती'तल्या 'गुलामगिरीला व नव-अस्पृश्यते'ला कायमची मूठमाती देण्याचा मनोमन निर्धार करा!

जाता जाता, बायबलमधला एक जाज्वल्य संदेश उद्धृत करुन आजच्या 'मराठी-दिना'च्या संदेशाची इतिश्री करुया... ''तुम्ही जग जिंकलंत; पण, जिंकताना आपला आत्मा गमावलात, तर त्याचा काय उपयोग???''

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

**(संयुक्त-महाराष्ट्रानंतर आता, 'स्वायत्त-महाराष्ट्र'... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त-महाराष्ट्र'... 'शिवछत्रपती-राष्ट्र'!)**

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

*(ता. क. : ज्यांच्या जन्मदिवसाप्रित्यर्थ हा मराठी-दिन साजरा केला जातो... त्या महाकवी कुसुमाग्रजांनी संयुक्त-महाराष्ट्र चळवळीला फार मोठं योगदान दिलं होतं... आणि, आता त्या संयुक्त-महाराष्ट्रालाच, 'राष्ट्रांतर्गत राष्ट्र, स्वायत्त-महाराष्ट्र' करण्याची पुढची मोठी जबाबदारी, तुमचीआमची सर्वांचीच आहे, हे विसरुन चालणार नाही!)*

## 'धर्मराज्य पक्षा'च्या वाहतूक शाखेला धोरणात्मक सूचना *...(पान क्र. ७ वरुन)*

राममारुती रोडवरुन गावदेवीकडे जाणाऱ्या रिक्षांसाठी, डॉ. आगासकर मार्गावरुन उजवीकडे तर, गावदेवीवरुन बाहेर पडणाऱ्या रिक्षांसाठी, डॉ. बेडेकर हॉस्पिटल शेजारील नातू मार्गावरुन बाहेर पडण्याची शिस्त लावल्यास, या संपूर्ण वर्तुळाकार परिसरात वाहतूककोंडी होण्याची शक्यता फार कमी होईल. मुळात संभाजी पथावरुन नो-एंट्री घेऊन, उजवीकडे सहयोग मंदिर सभागृहाकडे बिनदिक्कतपणे प्रवेश करणाऱ्या बेशिस्त रिक्षाचालकांमुळेच, इथे संध्याकाळी प्रचंड वाहतूककोंडी होत असते. परिणामी, प्रत्यक्षात त्याचा संपूर्ण ताण हा, नौपाडा परिसरातील वाहतुकीवर होत आहे आणि याला बेशिस्त दुचाकीस्वार व रिक्षाचालक हेच जबाबदार असल्याकारणाने, ठाणे शहरात प्रायोगिक तत्त्वावर बद्दल करताना, अशापद्धतीने वाहने चालविणाऱ्यांवर, सर्वप्रथम कठोर-कायदेशीर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, वाहतूक शाखेच्या उपायुक्तांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# ‘आमच्या ‘धर्मराज्य पक्षा’चा जीव जरी छोटा असला; तरी, त्याची तत्त्वं-धोरणं फार मूलगामी, व्यापक व जनकल्याणकारी आहेत!

**‘‘श्रीकृष्णाचा जीवनसंदेश, शिवछत्रपतींची राजनिती, समाजवाद तसेच मार्क्सच्या साम्यवादाचा गाभा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ‘समतेचा संदेश’ आणि ‘दरिद्री–नारायणाच्या उत्थाना’ची म. गांधींची संकल्पना तसेच त्यांचा अहिंसेचा संदेश’’... ही ‘धर्मराज्य पक्षा’ची ‘जीवनमूल्ये’ आहेत... ‘‘Zero Tolerance Towards CORRUPTION And EXPLOITATION OF MAN NATURE’’, हे आमचं ‘ब्रीद’ आहे आणि त्याबाबत, आम्ही कुठलीही तडजोड करणे नाहीच.**

‘सत्याचा मार्ग’ खडतर खरा; पण, तोच अंतिमत: शाश्वत व समाजाच्यादृष्टीने अंति हितकारक असतो. सध्या देशात जे काही चाललंय, ज्यापद्धतीने ‘राज्यघटना’ गुंडाळून ठेवली जातेय... एकाधिकारशाही, हुकूमशाहीचा नंगानाच सुरु आहे, देशात विघटनक्षम अशी मोठी अस्वस्थता आहे, **देशाच्या पूर्वोत्तर भागात (मणिपूर) हत्याकांड व अग्निकांड सुरु आहे... दुर्दैवाने, थोड्याफार फरकाने तेच ठाणे शहरात सुरु आहे. ठाण्यातील ‘व्यवस्था’, हे ‘शासन’ नसून ‘दु:शासन’ आहे! ठाण्यात ‘रामराज्य’ तर सोडाच; पण, ‘हिंदुत्वा’च्या बुरख्याआड चक्क ‘रावणराज्य’ सुरु आहे... गगनचुंबी इमारती, चकाचौंध मॉलटॉल, रुंद–विस्तीर्ण रस्ते, पंचतारांकित बागा यामुळे ही ‘ठाण्याची लंका’ वरकरणी कोणाला ‘सोन्या’ची भासेल... पण, या ठाण्यातील राजकीय रावणांच्या लंकेच्या नसानसातून दहशतीचं, अन्याय–अत्याचाराचं नासलेलं रक्त वहातंय... तिच्या रंध्रारंध्रातून घाण व दुर्गंधीयुक्त ‘पू’ वहातोय... पण, त्याबद्दल चकार शब्द काढायची कोणाची हिंमत नाही, ही मंदिर–मस्जिद–चर्च–गुरुद्वारामधील पवित्र शांतता नाही, ही आहे भयाण ‘स्मशान–शांतता’... भयंकर दहशतीमुळे हे ‘जिवंत मुडद्यां’चं शहर झालंय आणि इथल्या खाकी वर्दीतल्या पोलिसदलाचा चेहराच खाकी पोखाखासारख्या खाकी रंगाच्या धुळीने माखलेला, मलिन झालेला आहे... त्या चेहर्यासकट, त्यांचं या शहरातलं ‘सद्रक्षणाय खलनिग्रहणाय’ असं लिखित ब्रीद असलेलं अस्तित्वंच पुसल्यासारखं झालंय!**

हकनाक १४४ कलम लावण्याचा बहाणा करतअत्यंत सनदशीररित्या, शांततामय आंदोलन करण्याचाही आमचा घटनात्मक–अधिकार देखील ठाणे–पोलिस प्रशासन धुडकावून लावत आहे आणि त्याचवेळेस ठाण्यात ‘तोडफोड–संस्कृती’च्या राजकीय पक्षांची मात्र आदोलनं शहरात बिनदिक्कत चालू आहेत व त्यांना ना कुणी अडवत, ना कुणी जाब विचारत... या दुर्दैवी प्रकाराला काय म्हणावं

देशात सध्या, जे काही चाललंय (जातधर्म–विद्वेष, अदानी–प्रकरण, भांडवलशाहीचं थैमान व अमानुष ‘आर्थिक–विषमता’, ऑलिंपिकपदक विजेत्या महिला–पहिलवानांचं बड्या सत्ताधुंद राजकारण्याकडून लैंगिक–शोषण, विरोधकांवरील ईडी–सीबीआय–आयटी या सरकारी–दमनयंत्रणांकरवी एकतर्फी कारवाई, गोदी–मिडीया’तून ‘असत्याचा बाजार’ मांडला जाणं इ. इ.) ही ‘लोकशाही’ आहे की, ‘हुकूमशाही’? ही ‘लोकशाही’ आहे की, पोलिसांची ‘ठोकशाही’?

सद्यस्थितीत न्यायदान–यंत्रणा, हाच एकमेव आशेचा लुकलुकता किरण... न्यायालय, हाच या अंधारयुगातील शेवटचा आधार आणि त्याचं आधाराने अजय जयाला आज आश्वस्त केलंय व त्याच्यातला ‘सत्य व न्याया’साठी धडपडणारा ‘चळवळ्या’ जिवंत ठेवलाय... त्याप्रित्यर्थ, ठाण्यातील न्यायालयाचे, समस्त ठाणेकरांनी आभार मानावे, तेवढे थोडेच आहेत.

**व्यवस्थेतल्या एखाद्या प्रभावशाली व्यक्तिच्या नातलगाच्या ‘कथित’ अवमानावरुन, महापालिका–कर्मचाऱ्यांनी ‘वरुन आलेल्या’ आदेशाने थेट दुकानात घुसायचं आणि दुकानाची प्रचंड तोडफोड–नासधूस करत ठाण्यात दहशत निर्माण करायची... हे कितपत योग्य ठरेल?**

आमच्या अजय जयाने, कुठल्याही व्यक्तिच्या विरोधात नव्हे; तर, नेमक्या त्या ‘दहशती’विरोधातच आवाज उठवला. ‘अजय जया’ या, शहरातल्या सदसद्विवेक बुद्धीचा राखणदार (Conscience-Keeper) असलेल्या नवतरुणाने आवाज उठवला; तर, ‘‘चोर सोडून संन्याशाला फाशी’’ देण्याचा प्रयत्न, ठाणे शहरातील ‘व्यवस्थे’करवी व्हावा?

...म्हणूनच, आता ठाण्यापासून सुरुवात–रुजूवात होऊन प्रत्येक शहरं–उपनगरं–गावपाड्यांमध्ये ‘व्यवस्थे’तल्या भ्रष्टाचार, दहशत–दादागिरी आणि हडेलहप्पी कारभाराविरुद्ध जीवावर उदार होऊन निर्भयपणे ‘सत्यकठोर’ आवाज उठवणाऱ्या धाडसी व नितीवान तरुण–तरुणींची मोठी साखळीच तयार व्हायला हवी... तरच, तेथील कारभारात मूलभूत सुधारणा होतील व देशातील लोकशाहीदेखील जिवंत राहील!

**...वाईट जास्तीचं यासाठी वाटतं की, कथितरित्या ‘‘प्रचंड ‘व्यावसायिक दबाव–दडपणा’खाली, आपलाच ‘आत्मद्रोह’ करत ‘दुकानात काहीच घडलं नाही’ असा, ‘तो मी नव्हेच’ टाईपचा निलाजरा खोटा अवतार धारण करणाऱ्या मालकाचा व्हिडीओ हाती लागताच’’... ज्याला, ‘लोकशाही’चा ‘चौथा–स्तंभ’ म्हणायचं त्या, ‘लोकमत’ दैनिकासारख्या मोठ्या दैनिकाचा समावेश असलेल्या वृत्तपत्रसृष्टीनं घाईघाईने, या ‘प्रशांत कॉर्नर’ तोडफोडीची धड विचारपूस न करता वेड्यावाकड्या बातम्या छापल्या. हे सारं आक्रित, त्यांना करोडोंच्या जाहिराती व निधी पुरवणाऱ्या राजकीय–धटिगणांना खूष करण्यासाठी होतं व त्यातून, अजय जयाची व पर्यायाने ‘धर्मराज्य पक्षा’ची नाहक यथेच्छ बदनामी केली गेली... हे ही एकवेळ आम्ही समजून घेतलं; पण, त्यानंतर गेले महिनाभर सातत्याने ‘अजय जया’ला जामीन मिळाल्यावर ‘पत्रकार परिषद’ घेऊन (ज्यात, ही ‘बातमीछाप’ मंडळी आलीच नाहीत), आमची बाजू लेखी मांडून; तसेच, प्रत्यक्ष भेटून पाठपुरावा करुनही काडीमात्रदेखील आमची बाजू छापत नाहीत... या वृत्तपत्रीय पाजीवृत्तीला, नीचपणाला काय म्हणावं?**

...असो, ‘सत्ते’च्या राक्षसी दडपणाखाली ‘सत्य’ झाकू पहाणाऱ्यांना, आम्ही म. म. देशपांडे या नावाच्या कवीने लिहीलेल्या फक्त, ‘चारच ओळी’ खालीलप्रमाणे उद्धृत करतो...


**‘‘सारा अंधारच प्यावा, अशी लागावी तहान...**
**एका साध्या सत्यासाठी, देता यावे पंचप्राण !!!’’**

**...तेव्हा, आम्ही कुठल्या ‘राजाची रयत नव्हे’; तर, आम्ही आहोत, ‘‘स्वतंत्र–सार्वभौम देशाचे नागरिक’!**

म्हणूनच, या देशातलं ‘लोकशाही–तत्त्व’, या देशाचं सर्व नागरिकांना ‘मूलभूत हक्क’ प्रदान करणारं संविधान व ‘प्रजासत्ताकत्व’ पुढील पिढ्यापिढ्यांसाठी जिवंत ठेवण्यासाठी, हा आमचा लढा, हा आमचा अट्टाहास आहे... ‘धर्मराज्य पक्षा’चा तो निर्धार आहे!!

कुणाही व्यक्तिविशेषाच्या वगैरे विरोधातला, हा आमचा लढा मुळीच नव्हे, हा लढा दुष्ट, वाईट प्रवृत्तींविरोधात आहे... आणि त्याबाबत, न्याय–सत्याच्या प्रस्थापनेसाठी ‘प्राणत्याग’ करायचीही आमची तयारी आहे, एवढंच संबंधितांनी ध्यानात घ्यावं... धन्यवाद!

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***



प्रसारमाध्यमातून साभार

## जय श्रीराम! जय श्रीराम !!

बढती बेरोजगारी,
नही है काम...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

किसान की फसल को,
नही है दाम...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

बढती महंगाई,
नही लगाम...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

अदानी–अंबानी,
भरे गोदाम...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

बिक गयी मीडिया,
नही रही जान...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

नोटबंदी–जीएसटी से,
सब परेशान...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

गिर गया रुपैया,
नही कोई स्थान...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

मंदी के चलते,
बिक गये खेत–खलीयान...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

आरबीआय–सेबी को,
किया बेजान...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

ईडी–सीबीआय के आड में,
चलाये ये दुकान...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

पेट्रोल–डिझेल ने,
किया चक्का जाम...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

विदेश में हुवा,
पीएम का अपमान...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

अंधभक्त दे रहे,
विकास पे ग्यान...
जय श्रीराम! जय श्रीराम !!

# मणिपूरची आग भडकवण्यात चीनचा हात...!!!

'लोकमत' समूहाचे डॉ. विजय दर्डाजी यांचा एक 'जावईशोध', एक नवा 'फंडा'... (थोडक्यात, सरकारचं अपयश, नाकर्तेपणाच नव्हे; तर, मणिपूर पेटण्यामागचा 'डबल–इंजिन सरकार'चा 'दोष' झाकण्याचा व त्यातून, भाजप–संघ धुरिणांचं 'दिल खुष' करण्याचा एक केविलवाणा प्रयत्न...)

**...यापूर्वी, त्यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यात अचानक पोलादीपुरुष वल्लभभाई पटेलांचा भास होऊ लागला होता. त्यामुळेच, मोदी–शाह सरकारने ३५०० कोटी रुपये खर्च करुन वल्लभभाई पटेलांचा पुतळा उभारला; तसा, धनाढ्य डॉ. विजय दर्डाजींनी देखील किमान ३५० कोटी रुपये खर्च करुन अमित शहांचा पुतळा नागपुरात उभारला, तर कुणी आश्चर्य वाटून घेऊ नये!**

**'गोदी–मिडीया'ने चाटूगिरीची सगळीच हद्द पार करुन टाकलीय... कालपरवापर्यंत काँग्रेसच्या मांडवाखाली वावरणारे आणि वाढणारे; सत्तेचं समीकरण बदलताच तोच माणूस आपल्या डोक्यात गोळी घालून घेण्याचा विचार करु शकतो; जो, इतरांच्या डोक्यातही गोळ्या घालण्याची अमानुष, हिंसक क्षमता राखून असतो...!!!**

लाखो लोकांचं नृशंस हत्याकांड घडवणारा हिटलर, अखेरीस स्वतःच्या डोक्यात गोळ्या झाडूनच मेला होता!

...बरं, हिंसा ही फक्त कायिक–स्वरुपाचीच (शरीराशी संबंधित) नसते; तर, असंख्यांच्या मनाला, त्यांच्या आत्म्यांना मरणप्राय क्लेश देणे, यातना देणे... त्यांच्या सहनशीलतेचा अंत पहात रहाणे... यासारखी, राक्षसी–महत्त्वाकांक्षेपोटी निपजलेली मानसिक–विकृतीदेखील 'हिंसामय' तर असतेच; उलट, प्रसंगी साक्षात मृत्यूचं तांडव घालण्याच्या हिंसेपेक्षाही जास्त तिरस्करणीय, गर्हणीय असते!

(याचा, महाराष्ट्रात चालू असलेल्या कुठल्याही राजकीय घडामोडींशी संबंध नाही...)

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***




## *हवेत आम्हा 'गांधी महात्मा' आणि 'गुरुजी साने'!..**(पान क्र. १० वरुन)*

धापा टाकायला लावणारे आणि असुरक्षिततेनं क्षणाक्षणाला भयभीत करुन सोडणारे 'मस्क किंवा गेट्स' नकोत!

**भांडवलदारांनो, आम्ही वन्यप्राण्यांसारखे जंगलात रहात नाही आहोत... जरा निवांत सुखाने जगू द्याल की, नाही? नको आम्हाला तुम्ही निर्माण करत आलेली सुखसंसाधने, नको त्या सोयीसुविधा... ज्या, अंति आमचं माणूसपणचं हिरावून घेत, गुलाम बनवतायत! कितीही, संसाधनांनीयुक्त झालो, नवश्रीमंत झालो; तरीही, आम्ही क्षणभरही थबकून खराखुरा 'विसावा' घेऊ शकत नाही... ही आमची आजची 'शोकांतिका' आहे!** आम्ही, बालपणीच्या पुस्तकात वर्णिलेल्या त्या भित्र्या सशासारखे जगत असतो... जो, झाडाचं पान पडताच, आकाश पडलं म्हणून धडपडत घाबरुन धावत सुटतो... याचा अर्थ, मग या सगळ्या आधुनिक जगण्याच्या धडपडीतून आम्ही मिळवलं काय आणि आमच्या हाती लागलं काय? स्थूलता, सततची चीडचीड, वाढलेला रक्तदाब (BP), मधुमेह (डायाबिटीस), मणक्यांचे विकार, मनोरुग्णता, झोपेच्या गोळ्यांचा सर्रास वापर इ. इ. हीच आमची 'खरी कमाई' समजायची की, बँकेत, शेअर, बॉण्ड्स गुंतवणुकीत पडून राहीलेला 'बॅलन्स'?

म्हणूनच, ''साधी रहाणी, उच्च विचारसरणी''... हेच जगण्याचं मूलभूत तत्त्व हवं... ''सर्वांभूति निखळ प्रेम'' आणि निसर्ग–पर्यावरणाला आपल्या अपत्यासारखं जपणं... हा, हा म.गांधी–सानेगुरुजींचा संदेशच, वैश्विक विचार व जगण्याचा स्थायिभाव व्हायला हवा!

पहाता पहाता भांडवलशाही, तुमच्याआमच्या नसानसात, नसानसातल्या रक्तात एवढी सापाच्या विषासारखी भिनलीय की, क्षुद्र स्वार्थापोटी तिचे आपण संवेदनशून्य 'पाईक' बनत, काय काय नृसंश पातकं करतोय... याचं भान तर आपल्याला उरलेलं नाहीचं; उलट, आपण योग्य तेच करतोय... हीच, 'व्यावसायिकता' (Professionalism) होय, असा 'मस्क आणि गेट्स' सारख्या अनेक भांडवलदारांच्या प्रभावाखाली, मानवजात व उर्वरित सजीवसृष्टी घातकी काडीकचरा, आपल्या डोक्यात आपला आपणच एवढा ठासून भरुन घेतोय की, आपणच आपली बुद्धीच साफ बधीर करुन टाकलीय.... हेच, भांडवलीकरणाचं म्हणा, खाजगीकरणाचं म्हणा; विकृत पण, चमत्कारिक लक्षण आहे आणि त्याचा दुर्दैवी फैलाव, कोविड–ओमायक्रॉन विषाणूपेक्षाही भयंकर वेगाने आणि सर्व जगभरात झालाय!

त्याविरोधात, लसीकरणाचा डोस म्हणा किंवा रोग झाल्यास बरा करण्याचं औषध म्हणा... ते एकच, म्हणजे ''म. गांधी आणि सानेगुरुजीं'' सारख्या व्यक्तित्वांना संपूर्ण पृथ्वीतलावर आचरणात आणणे... आणि म्हणूनच तर आजवर, ''कुणी मारल्याने ना गांधी मरत, ना आत्महत्या करुन साने गुरुजी मरत!''

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

## *मणिपूर की बात' करो !!!...**(पान क्र. १ वरुन)*

गेलेले मनमोहनसिंग खूपच परवडले... पण, आजवर एकही पत्रकार–परिषद न घेता (हे असं आक्रित, जगाच्या पाठीवरील कुठल्याही लोकशाही देशात कधि घडलंय?), केवळ 'मन की बात करणारे' पंतप्रधान, या देशाला याहीपुढे परवडतील???

एवढं सगळं भीषण आक्रंदन घडत असताना... जणू मणिपूर हा, चीन–पाकिस्तानचा भूभाग असल्यासारखा 'अंबानी–अदानी पुरस्कृत'; तसेच, इतर धनदांडग्या भांडवलदारांच्या ताब्यात व भाजपाच्या अंकित असलेला 'गोदी–मिडीया'देखील 'शहामृगा'सारखा... सरकारी–जाहिरातींच्या 'मलईदार वाळू'त चोच खुपसून बसलेला!

...त्यामुळेच, या गोदी–मिडीया'ला मणिपूर जळताना दिसत नाहीय किंवा मरणाऱ्यांचे आक्रोश कानी पडत नाहीयेत!

**कालपरवापर्यंत तीन काळे शेती–कायदे करुन कॉर्पोरेटीय हितासाठी शेतकऱ्यांचा बळी देऊ पहाणारं, गरीब मुसलमानांवर बुलडोझर फिरवणारं भाजपाई–सरकार... आता, चार काळ्या कामगार–कायद्यांची काळी 'कामगार–संहिता' (Labour-Code) लादून संपूर्ण कामगार–कर्मचारीवर्गाला गुलामगिरीत ढकलत उध्वस्त करु पहातंय आणि तिथे....**

''...मणिपूर में केंद्रीय राज्यमंत्री का घर भी सुलगता नजर आ रहा है... फिर भी सुननेवाला–बोलनेवाला इस देश की केंद्रीय–सत्ता में कोई नहीं... 'लोकसभा–चुनाव' नजदिक है, देखते है इस देश के 'अल्बर्ट पिंटो' को, गुस्सा आता है या नहीं!''

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# ‘राष्ट्रपतींनाही जिचा मान ठेवावा लागतो; ती ‘खाकी वर्दी’ गेली आणि स्मशानातल्या राखेसारखी दिसणारी ‘राखाडी वर्दी’ मातली.... म्हातारी मेल्याचं दुःख नाही, काळ सोकावतोय!

महाराष्ट्रात ‘प्रजासत्ताका’चा अभिनिवेश निर्माण करणारा ‘‘माहिती अधिकार कायदा’’ २००३ साली संमत झाल्यावर, दुर्दैवाने पुढे दोनच वर्षांत तळागाळातल्या श्रमिकवर्गाच्या लोकशाही हक्काचं थडगं बांधणारा PASARA (Private Security Agencies Regulation Act-2005) कायदा महाराष्ट्राच्या विधिमंडळाने संमत केला. ‘पसारा’ कायद्याअंतर्गत तयार झालेली, पोलिसांना समांतर असणारी ही खाजगी-भाडोत्री ‘दमन-यंत्रणा’, कायदा करतानाच ठरलेल्या ‘गुन्हेगारी-संगनमता’नुसार आज असंख्य कंपन्यांमधून (विशेषतः बड्या आयटी व बहुराष्ट्रीय कंपन्यांमधून) जुलमी, दहशतवादी ‘खाजगी सेना’ म्हणून बेलाशक कार्यरत आहे... तरीही, सगळी राजकीय-प्रशासकिय व्यवस्था, जणू काही, या पातकापासून आपण नामानिराळे असल्याच्या आविर्भावात शांत राहून, या भयावह व संतापजनक वस्तुस्थितीकडे साफ दुर्लक्ष करतेय; कारण, या व्यवस्थेतल्या सगळ्यांचेच हात यात भयंकर बरबटलेले आहेत.

**बॅ. नाथ पै नेहमी म्हणायचे, ‘‘भारताच्या दक्षिणेकडून उत्तरेकडे सरकावे, तसतशी भारतीय नीतिमत्ता साफ खालावत जाते’’... मूलतः समाजघातकी प्रवृत्तीचा व उलट्या काळजाचा HR/IR अधिकारीवर्ग, अनेकप्रसंगी (बहुशः, उत्तर भारतातून) अफझलखानासारखा ‘‘युनियन संपवण्याची सुपारी देऊन’’ महाराष्ट्रात वेळोवेळी विविध कंपन्यांमधून हल्ली सर्रास बोलावला जातोय... ही मंडळी आली की, या गुंड प्रवृत्तीच्या भाडोत्री बाऊन्सर्सचा कंपनीतला चंचूप्रवेश ठरलेलाच. त्यातूनच, बाऊन्सर्स पुरवणार्या या खाजगी सुरक्षा एजन्सीज, पावसाळ्यात बेफाम उगवणार्या कावळ्याच्या छत्र्यांसारख्या, युनियन संपवण्यासाठी आवतणं धाडणार्या कंपन्यांच्या आर्थिकबळावर महाराष्ट्रभरातल्या सगळ्या औद्योगिक-वसाहतींमधून हातपाय पसरत्या झाल्यात.**

बर्याचदा, बड्या कंपन्या, PASARA कायद्याअंतर्गत नेमलेल्या डझनावरी भाडोत्री बाऊन्सर्सच्या दिमतीला लष्कराचं पेन्शन खाणारी (ती ही मंडळी बहुशः उत्तर भारतातलीच) काही निवृत्त झालेली ‘माजोरी’ मंडळी, हल्ली बेलाशक कामाला जुंपतात. त्यात, पुन्हा उत्तर भारतात बंदूक/रिव्हॉल्व्हरचा परवाना (लायसन्स) सहजी मिळत असल्याने, तशा शस्त्रसज्ज चारचौघांचा, हमखास या धटिंगण बाऊन्सर्समध्ये समावेश असतोच.

**नेपोलियन म्हणायचा, ‘‘सैन्य, फक्त पोटावर चालतं’’, पण, त्याचा दुर्दैवी प्रत्यय... कंपन्यांमधल्या, या असल्या काही लष्करातून निवृत्त झाल्यावर, युनियन आणि कामगार-लढे संपवण्याचा व त्यांचे संसार उद्धस्त करण्याचा विडा उचलणार्यांना व त्यातूनच, आपलं पोट भरणार्यांना पाहील्यावर येत रहातो. काही मोठ्या आयटी (IT) कंपन्यांमधून तर, पांढरपेशा कर्मचार्यांनी तसेच, आयटी तंत्रज्ञांनी ‘युनियन’ करायला धजावू नये म्हणून, त्यांना मुद्दलातच घाबरवून सोडण्यासाठी (संभाव्य दहशतवादी हल्ल्याचं बादरायण निमित्त पेश करत) थेट कार्बाईनधारी कमांडोज नेमलेले असतात.**

दुहीची, फुटीची बीजं पेरुन कामगार-संघटना कशी खिळखिळी करायची, खोटेनाटे धंदे करुन व मोठ्याप्रमाणावर अफवा पसरवून, खोटी बदनामी करुन कामगार संघटनेचं प्रामाणिक, लढाऊ नेतृत्त्व जबरदस्तीने संपवून त्याजागी, कंपनी-पुरस्कृत (Company-Sponsored) व्यवस्थापनाचे ‘दलाल’ असलेले कामगार पुढारी दहशतीने कसे नेमायचे.... याचंच, अनेक HR/IR संस्थांमधून मुख्य प्रशिक्षण असल्याने क्ठ व्याख्येनुसार, कामगार-कर्मचारीवर्गासाठी खराखुरा ‘ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट’वाला अधिकारी ‘ईद का चाँद’ पेक्षाही अगदी दुर्मिळच... खरंतर, कामगार-कर्मचारीवर्गाची हातोहात फसवणूक करत अतोनात शोषण करुन त्यांना उध्वस्त करणार्या या महाभागांना, ‘ह्यूमन रिव्हर्स डेव्हलपमेंट’वालेच म्हटले पाहीजे! **कामगारांना गंडवून कंपन्यांचे निव्वळ नफे फुगवण्याचं ‘कामगारघातकी’ प्रशिक्षण घेतलेला, हा ‘तथाकथित’ सुशिक्षित अधिकारीवर्ग, हे सगळं अगदी बिनबोभाट सुसंघटितपणे; पण, कसलेल्या गुन्हेगाराला साजेशा छुप्या पद्धतीने कितीही करत असला... तरी, या ‘डरपोकां’ची ही सगळी दहशत, दादागिरी... या मस्तवाल ‘बाऊन्सर्स’च्या जीवावरच चालते (शिवाय, अनेक ठिकाणी, त्या खाजगी सुरक्षा एजन्सीजकडून क्ठ/खठ वाले कमिशनच्या टक्केवारीचा भरपूर ‘मलिदा’ खात असल्याचं ऐकिवात आहे, ते वेगळंच), हे त्रिवार सत्य होय!**

विशेष म्हणजे, ‘‘जे जातिवंत, हाडाचे ‘फौजी’ असतात’’... ते अशा HR/IR व्यवस्थापकांच्या वाईटसाईट कृत्यात सहभागी होत नाहीत आणि सरळ नोकरीवर लाथ मारुन निघून जातात... हे ही, आम्ही अनेक ठिकाणी अनुभवलंय. मात्र, कंपन्यांमधील HR/IR अधिकारीवर्गाला खाजगी सुरक्षा एजन्सीजच्या बाजारात शोधून असे नवे ‘हुकमाचे बंदे’’ असलेले, नोकरीसाठी ‘गुलाम’ बनलेले व सत्यअसत्याची, न्यायअन्यायाची चाड नसलेले टगे बाऊन्सर्स सहजी मिळत रहातातच. स्वतः धड न शिकलेले फक्त, व्यायामपटू असलेले हे बाऊन्सर्स, प्रत्यक्षात गरीब घरातलेच असतात... पण, पोटासाठी वाटेल ते करायला सरावलेल्या, या पिळलेल्या स्नायूंच्या ‘गुलामां’कडे.... आपण कुणाच्या पोटावर लाथा कशासाठी मारतोय, याची क्षिती बाळगण्याएवढी सदसद्विवेक बुद्धी उरलेली नसते... अशारितीने, ही नृशंस व्यवस्था, व्यवस्थितपणे ‘‘कामगाराला कामगाराविरुद्ध आणि गरीबालाच गरीबाविरुद्ध लढायला उभी करण्यात यशस्वी होते व स्वतः मात्र, सुरक्षित कोंदणात नामानिराळे राहून आपलं अन्याय-शोषणाचं इप्सित अत्यंत कुटिलपणे साध्य करते’’!

त्यातून, हे अज्ञानी, नासमज ‘बाऊन्सर्स’ स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या उदरभरणासाठी पापांच्या राशी उभ्या करत जातात... ज्याचं ‘कर्मफळ’, पुढे त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना भोगावं, हे लागतंच, लागणारंच! ‘‘वाल्याच्या पापात भागीदार व्हायला, त्याचे कुटुंबियसुद्धा तयार नव्हते’’... पण, आत्यंतिक स्वार्थी व संवेदनाशून्य असलेल्या HR/IR अधिकारीवर्गाच्या नादानं आणि त्यांच्या इशार्याने, त्यांच्या पापात भागीदार व्हायला, हे टगे मात्र, कसे तत्पर असतात, हे सगळं अनाकलनीय तर आहेच; पण, त्यांच्यासह आपल्या सर्वांचंच ते दुर्दैव होय.... आणि, त्यावरच, हा **‘‘कंत्राटी-कामगार पद्धतीपासून ते आऊटसोर्सिंग’’पर्यंतचा सगळा व्यवस्थापकीय अन्याय-अत्याचार-शोषणाचा पातकी डोलारा उभा रहात असतो... ‘कंपनी-दहशतवाद’, हा (CORPORATE-TERRORISM) त्यातूनच निर्माण होतो!**

**महाराष्ट्रातल्या भोळ्याभाबड्या जनतेनं ज्यांच्यावर आंधळा विश्वास टाकला, ज्यांना आपल्या पायात धड चप्पल नसताना अनवाणी पायानं डोक्यावर घेतलं... त्याच सगळ्या प्रस्थापित राजकीय नेतेमंडळींनी उद्योगसमूहांशी गुन्हेगारी संगनमत करुन (कारण, त्यांच्याच काळ्या पैशांच्या राशीवर यांचं, निवडणुका लढण्यासह सगळं राजकारण उभं असतं), हा PASARA कायदा २००५ साली आणला आणि महाराष्ट्रातल्या बेसावध असलेल्या कामगारांवर व अवघ्या कामगार-चळवळीवर कुऱ्हाडीचा घाव घातला! त्यानंतरच, खाजगी सुरक्षा एजन्सीजचे बाऊन्सर्स, हाताशी सहजगत्या ‘कायदेशीर पद्धती’ने उपलब्ध असल्याने कामगारांच्या समूहशक्तिचा दबाव जुमानण्याची व्यवस्थापकीय मंडळींना फारशी गरज उरली नाही. उलट, कारपरवापर्यंत, आपल्या हक्कांसाठी आणि झालेल्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढणारा कामगार, या कसलाही विधिनिषेध नसलेल्या, ‘खाजगी सुरक्षा एजन्सीज’च्या वाढत्या सैतानी दबावाखाली उंदरासारखा भयभीत झालाय.**

पोलिसांना निदान काही कायद्याचं भय किंवा कामगारांप्रति आपल्या जबाबदारीचं थोडं तरी भान असायचं किंवा होतं... पण, या नव्या ‘बाऊन्सर्स’ नावाच्या धटिंगणांच्या फौजेला तसलं काहीचं भय, भान बाळगायची गरज नसल्याने **HR/IR** वाल्यांच्या इशार्यावर, त्यांनी नुसतं ‘छू’ करताच, हे भाडोत्री श्वान भुंकण्यापासून चावण्यापर्यंत, वाटेल ते धंदे सगळीकडे बेगुमान करत सुटलेत.

‘पसारा’ कायद्याच्या आड, या खाजगी सुरक्षा एजन्सीजचा अमानुष व बेकायदेशीर ‘पसारा’ महाराष्ट्रात सर्वत्र वाढत चाललाय, हेच संतापजनक चित्र, सदरहू दि.९ फेब्रुवारीच्या अंकातली दै. ‘लोकमत’मधली बातमी दाखवतेय.....

***...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

# सांप्रत ‘रशिया–युक्रेन संघर्षा’तून समस्त कामगार–कर्मचारीवर्ग काही ‘धडा’ घेईल काय???

केवळ, प्राचीन–अर्वाचीन इतिहासच नव्हे; तर स्थानिक, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय पातळीवर, आजमितीस घडणारा कुठलाही घटनाक्रम... हा आपल्याला ‘गुरु’ बनून वेगवेगळ्या शिकवणुकीचा ‘धडा’ सातत्याने देत असतो; फक्त, त्यासाठी तसा शोधक व विश्लेषणात्मक दृष्टिकोन मात्र, आपल्यापाशी हवा!

**‘‘महाभारतात कपटी इंद्राला कवचकुंडलं दान केल्यानं दानशूरतेचा अतिरेक (सद्गुणाचा अतिरेक, हा ही एक दुर्गुणच) करणाऱ्या कर्णाचा युद्धात वध करणं, अर्जुनाला शक्य झालं... तसाच, काहीसा प्रकार युक्रेनच्या बाबतीत घडताना दिसत आहे’’. फरक इतकाच की, इंद्र हा कौरवांचा शत्रूपक्ष असलेल्या पांडवांपैकी अर्जुनाचा पिताश्री होता; तर, युक्रेनचा ‘घात’ करणारे राजकारणी स्वतः युक्रेनियनच होते. पण, ते होते पक्के कारस्थानी, भ्रष्टाचारी आणि हडेलहप्पी हुकूमशाही पद्धतीने शासन करणारे... तसेच, तत्कालीन रशियन सरकारच्या हातातलं ‘बाहुलं’ असलेले व रशियन सरकारचे संपूर्ण ‘मिंधे’ असलेले!**

रशियन सरकारचे ‘हस्तक’, ‘दलाल’ असलेल्या या तत्कालीन युक्रेनियन सत्ताधाऱ्यांनी, मारक–क्षमता व संख्येच्या दृष्टीने जगभरात तिसऱ्या क्रमांकावर असलेला व युक्रेनची संरक्षक ‘कवचकुंडलं’ म्हणून गणला जाणारा, सगळा आण्विक–अस्त्रशस्त्र साठा (By 1996, Ukraine had returned all of its nuclear warheads... estimated 1,900 strategic warheads, 176 intercontinental ballistic missiles-ICBMs and 44 strategic bombers by 1996, and in December 1994) युक्रेन देशाचा ‘अवसानघात’ करत पूर्वनियोजित व पद्धतशीर आखलेल्या कटानुसार रशियाला बहाल केला... सामर्थ्यवान युक्रेन अशातर्हेनं एकप्रकारे ‘नपुंसक’ बनवला गेला आणि त्या बदल्यात, त्यानं मिळवलं काय, तर, फक्त युक्रेनच्या सार्वभौमत्वाचं रक्षण करण्याची रशियन सरकारतर्फे दिली गेलेली ‘फसवी व तोंडदेखली हमी’ व रशियन रुबलमध्ये मदतनिधी!

सार्वभौमत्वाचं रक्षण करण्याची हमी देणाऱ्या त्याच रशियाने, संपूर्ण युक्रेनियन जनतेला आज तोंडघशी पाडत,



युक्रेनपुढे स्वतःच अस्तित्व टिकवण्याचं आव्हान ठेवलंय!

या सगळ्या घटनाक्रमाचा आरंभ, सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर म्हणजेच, वर्ष–१९९१ नंतर झाला; ज्या, सुमारास ‘‘खाउजा’’ (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) धोरणामुळे भारतीय व महाराष्ट्रीय कामगार–चळवळीवर कुऱ्हाडीचे ‘घाले’ पडायला सुरुवात झाली होती... अशी ही, दोन्ही विश्वासघातकी घटनाक्रमांची विचित्र कालसुसंगतता आहे!

**युक्रेनियन राजकारण्यांप्रमाणेच ‘भांडवलदारां’चे बटिक, हस्तक बनलेल्या, या तुम्हीच डोक्यावर घेतलेल्या, हृदयसिंहासनावर बसवलेल्या इथल्या राजकारण्यांनी व या अशा विश्वासघातकी राजकीय नेत्यांचा कित्ता गिरवत स्वार्थापोटी पेंढारी बनलेल्या कामगार–पुढार्यांनी, ‘‘कारखाना जगला; तर, कामगार जगेल’’, असे कामगारांचा अवसानघात करणारे ‘हाकारे’ तारस्वरात देऊन महाराष्ट्रातल्या कामगार–कर्मचारीवर्गाची आणि समस्त कामगार–चळवळीची अक्षरशः ‘शिकार’ केली... लांडगेतोड त्यानंतर, आपसूकच झाली... अशाप्रकारे, ‘‘कुऱ्हाडीचे दांडे गोतास काळ ठरले’’!**

संरक्षक ‘कवचकुंडलं’ असलेला युक्रेनियन आण्विक–अस्त्रशस्त्र साठा; जसा तेथील ‘रशियाधार्जिण्या’ कारस्थानी, दलाल राजकारण्यांकडून ‘त्यागला’ गेला; तसाच, कामगारांची संरक्षक ‘कवचकुंडलं’ असलेल्या...

१) पगारवाढीच्या करारांचे कालावधि तीन वर्षांपेक्षा कधिही जास्त ‘नसणे’
२) बोनस किंवा सानुग्रह अनुदान ‘PF-Base’ सह सगळे भत्ते मिळून ‘एकूण पगारा’च्या सरासरी किमान २०% असणे
३) बदलता महागाईभत्ता–VDA
४) नवीन भरतीसाठी श्रेणीनिहाय पूर्वनिर्धारित पगार (Entry-Level Basic)
५) सगळे कामगार ‘कायम’
६) पगारात किमान ७०% ‘PF-Base’
७) ‘साडेसहा तास’ प्रत्यक्ष कामाचे तास असलेल्या एकूण ‘आठ तासां’च्या कामापेक्षा जास्त कामाला दुप्पट ओव्हरटाईम’’

.... वगैरे, सगळ्या कामगार हितरक्षक संकल्पना, देशी–विदेशी ‘भांडवलदारां’च्या इशाऱ्यावर ‘भांडवलधार्जिण्या’ राजकारण्यांकडून एका झटक्यात त्यागण्यात आल्या आणि त्या बदल्यात कामगार–कर्मचारीवर्गाच्या तेव्हा पदरी काय पाडण्यात आलं... तर, ‘झिरप–सिद्धांतां’चं (Percolation or Trickle-Down Theory) केवळ, ‘गाजर’ दाखवत आर्थिक भरभराटीची व रोजगारवृद्धीची ‘फसवी’ हमी! ‘‘ना रोजगार वाढले (खरंतरं, कंपन्या वाढल्या तसे, आधुनिक तंत्रज्ञानाने रोजगार वाढायच्याऐवजी कमीच होऊ लागले)... ना कामगारांना आर्थिक सुरक्षा–सुबत्ता मिळाली’’; उलटपक्षी, जी होती, नव्हती ती सगळीच सुरक्षितता व थोडंबहुत असलेलं आर्थिक–स्थैर्य, कंत्राटी–कामगार पद्धतीच्या व आऊटसोर्सिंगच्या रेट्यात आणि उढउ सारख्या तद्दन फसव्या संकल्पना जबरदस्तीने राबवून संपविण्यात आलं... त्यातून, महाराष्ट्रातला कामगार–कर्मचारीवर्ग देशोधडीला लागला!

थोडक्यात, महाराष्ट्रातला सगळा कामगार–कर्मचारीवर्ग, युक्रेनियन जनतेसारखा ‘‘चु.....’’ बनवला गेला आणि ‘‘आजही बनवला जातोय’’... त्याचीच कटू, विषारी फळे गेली काही दशके कामगार भोगतोय व त्याच्या पुढील पिढ्या भोगणार आहेत!

**...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

---

## ‘धर्मराज्य पक्षा’च्या वाहतूक शाखेला धोरणात्मक सूचना ...(पान क्र. ८ वरुन)

प्रसंगी तुम्हाला थेट संघर्ष करावा लागेल, तुमची तयारी असेल तर, तुम्हाला ‘आखरी रास्ता’ म्हणून संपासारखं हत्यार उचलावं लागेल; मग, ‘राजन राजे’ नावाची जादू कशी काम करते ते बघा. आम्ही ‘मिशन– म्हणून काम करतो... ‘कमिशन’ म्हणून नव्हे! आपल्या मूलभूत प्रश्नांकडे आपलं लक्ष केंद्रित झालं पाहिजे. तुमची लढाई आता केवळ, तुमच्यासाठी नाहीये; तर, ती तुमच्या भावी पिढीसाठी आहे. पर्यावरणीय महासंकट आल्यानंतर, तुमची जीवनशैली तातडीने तुम्हाला बदलावी लागणार आहे. कामगार चळवळीत आहात, पण फक्त, कामगार चळवळीतच राहू नका... कामगार आहात म्हणून, पण फक्त, कामगारच राहू नका. सजग व्हा, आपण देशाचे सूज्ञ व सुसंस्कृत नागरिक व्हा... **पुढच्या पिढ्यांची जबाबदारी आपल्या खांद्यावर आहे, याचे भान बाळगा. ज्याक्षणी तुम्ही ‘धर्मराज्य’कडे आलात, ज्याक्षणी तुम्ही या राजन राजेकडे आलात, त्याक्षणापासून तुम्ही पूर्वीसारखे राहिलेले नाहीत... यापुढे तुमच्या अंतर्बाह्य बदल होणार, तुमची कालची ओळख पुसली जाणार, एक नव्या विचारांचा प्रगल्भ कामगार म्हणून तुम्ही ओळखले जाल!’’ अशा शब्दांत मा. राजन राजे यांनी, ‘स्टेलमेक लिमिटेड’ कंपनीच्या कामगार सदस्यांना आश्वस्त केले.**

याप्रसंगी, ‘धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा’चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, कामगार प्रतिनिधी श्री. संतोष तावडे, ‘धर्मराज्य पक्षा’चे युवा कार्यकर्ते श्री. सिद्धेश सावंत–भोसले, श्री. नितीन उगले, ‘स्टेलमेक’ कंपनीतील युनिट अध्यक्ष श्री. रमेश गुप्ता, उपाध्यक्ष श्री. प्रवीण चव्हाण, सचिव श्री. महेंद्र जाधव, खजिनदार श्री. सुधाकर म्हसकर, सदस्य श्री. दिनेश चव्हाण, श्री. परेश खिरखिरे आणि श्री. रामदास सातवी आदी कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांसह, कामगार सदस्य मोठ्यासंखेने उपस्थित होते.

‘‘धर्मराज्य पक्ष आणि धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघात आलात... आता, ‘राजन राजे’ हा पंचाक्षरी मंत्रच तुम्हाला तारु शकतो!’’

वसईच्या ‘स्टेलमेक लिमिटेड’ कंपनीच्या कामगार सदस्यांना राजन राजेंनी केले आश्वस्त...

# हे भगतसिंगाच्या आत्म्याला तरी रुचेल काय???

**सर्वप्रथम, पंजाबच्या भगवंत मान यांच्या नेतृत्त्वाखालील आम आदमी पार्टीच्या सरकारचं मनःपूत अभिनंदन आणि सर्व आजीमाजी आमदार-मंत्र्यांचं बव्हंशी अनावश्यक व अतिशय खर्चिक असलेलं पोलिस-संरक्षण काढून घेण्याचा समयोचित पहिलावहिला प्रशासकीय निर्णय घेतल्याबद्दलही खूप खूप कौतुक!**

त्याचसोबत, भगतसिंगांच्या 'खाटकर कलान' या जन्मगावी 'आप'च्या नव्या सरकारने आपला शपथविधी-सोहळा आयोजित करावा, हे खरोखरीच स्पृहणीय होय... मात्र, तो त्या भगतसिंगांच्या जन्मगावी मोजक्या लोकांच्या उपस्थितीत अगदी साधेपणाने पार पडला असता; तर, ते फारच प्रशंसनीय व अनुकरणीय ठरलं असतं (भगतसिंगांची स्वतःची रहाणी अतिशय साधी होती)... पण, त्यासाठी होऊ घातलेला अतिरिक्त खर्च आणि त्याहीपेक्षा, १०० एकरावरील उभं पिक उध्वस्त करणं, हे कितपत योग्य आहे, हा प्रश्न कुणी अरविंदजींना विचारायला नको? ही निसर्गघातकी कृति अरविंद केजरीवालकृत ''हम करे सो कायदा'', ही हुकूमशाही मनोवृत्ती दर्शवत नाही काय? भगतसिंगाच्या आत्म्याला तर, हे रुचणं शक्यच नाही; पण, ज्यांना उपोषणाच्या, आंदोलनाच्या अनंत यातना देऊन त्या पुण्याईच्या बळावरच केवळ, अरविंद केजरीवाल राजकारणात धूर्तपणे शिरकाव करत आज एवढे यशस्वी राजकारणी झालेत... त्या, 'राळेगण सिद्धी'त सिंचनाचे शाश्वत-प्रयोग करणार्या अण्णा हजारेंसारख्या भूमिपुत्राला तरी हे कृत्य रुचेल काय, हा आजच्या घडीचा लाखमोलाचा सवाल आहे!

**आम आदमी पार्टी पंजाबात ऐतिहासिक विजयाचा झेंडा रोवत असताना व गोव्यात विधिमंडळात चंचूप्रवेश करत असतानाच.... दिल्लीच्या गोकुळपुरी झोपडपट्टीत ६० झोपड्यांना आग लागून तब्बल ७ जणांचा बळी जात होता; पण, त्याविषयी, अरविंद केजरीवाल यांनी चकार शब्द काढल्याचं आमच्यातरी ऐकिवात नाही, हे ही काय दर्शवतं?**

**दिल्लीत हवेचं भयंकर प्रदूषण आणि वाढतं उष्णतामान, निसर्ग-पर्यावरणाच्या संरक्षण-संवर्धनासंदर्भात युद्धपातळीवर काम करण्यासाठी सतत इशारे, फटकारे देत असताना, तुम्हाला १०० एकरावरील पिकं शपथविधीसाठी बेलाशक उध्वस्त कराविशी वाटतात, हे केवढं निषेधार्ह आहे? शेती, ही जीवनपद्धतीच प्रामुख्यानं असताना, ही पिकं तयार होण्यापूर्वीच उध्वस्त करताना, तुम्ही किती नुकसान भरपाई पैशाच्या स्वरुपात देता, ही बाब साफ गौण आहे. कागदाच्या रुपयांच्या गठ्ठ्यांनी त्या नष्ट केल्या गेलेल्या 'हिरवाई'ची भरपाई होऊ शकत नाही, एवढं समजण्याइतपत निसर्ग-पर्यावरणीय संवेदना अरविंदजींकडे आहेत काय, हे तपासून पहावं लागेल.** निसर्गाप्रति, सर्व प्राणीमात्रांप्रति जेवढा शक्य कोटीतला असेल तेवढा आदर, प्रेम दाखवायलाच हवं, हे जातिवंत भारतीय अध्यात्म होय... जसं वर्ष २०१६ मध्ये 'आर्ट ऑफ लिव्हिंग'वाल्यांनी त्यांच्या 'जागतिक सांस्कृतिक महोत्सव' शिबिरासाठी यमुनातिरावरचा निसर्ग उध्वस्त केला होता (ज्यासाठी, त्यांना 'राष्ट्रीय हरित लवादा'ने रु.५ कोटींचा दंड ठोठावला होता) आणि ज्याचा आम्ही त्याचवेळी तीव्र निषेध केला होता... त्याच धर्तीची, ही मानसिकता नव्हे काय? दोनचार एकरावरच्या पिकाचा एकवेळ विध्वंस समजून घेता आला असता; पण, १०० एकरावरचं उभं पिक, त्यातला 'अन्नांश' (ज्याला, आपण भारतीय तत्त्वज्ञानात 'पूर्ण ब्रह्म' म्हणतो) आपल्याला, राष्ट्रीयस्तरावर पक्ष-प्रचारासाठी नष्ट करावासा वाटावा, यातचं सगळं आलं!

आम्हाला आम आदमी पार्टीच्या यशाचं आणि कार्याचं जरुर कौतुक आणि अप्रूप आहे; परंतु, इथून पुढे, कुठलेही शासकीय-प्रशासकीय निर्णय व कारभार हा निसर्ग-पर्यावरणाचा सखोल विचार करुनच करण्याची नितांत गरज असताना, हे घडावं... यामुळे, आमच्या अंतरी एक कळ उमटून गेल्याशिवाय कशी राहील? 'आप'ला आमच्या इतःपर शुभेच्छा आहेत, त्यांनी जरुर हवंतर काँग्रेस किंवा अन्य कुठल्याही पक्षाची राष्ट्रीयस्तरावर जागा भरुन काढावी, दिल्लीतही सत्तारुढ व्हावं; **पण, हा राजकीय यशाचा ध्वज फडकवत असताना 'जागतिक तापमानवाढी'च्या पर्यावरणीय महासंकटकाळात एक गोष्ट आवर्जून ध्यानात ठेवावी की, ''निव्वळ, भ्रष्टाचारमुक्त स्वच्छ व तत्पर कारभार देऊन भागणार नाही; तर, माणसाचं आणि निसर्ग-पर्यावरणाचं टोकाचं शोषण-उध्वस्तीकरण करणाऱ्या 'भांडवलशाही'विरुद्ध दंड थोपटून उभं रहाण्याचं 'भगतसिंगांसारखं क्रांतिकारक व अवघड कार्य' तुम्हाला पार पाडावं लागेल... ते करण्याची, ''आजवर दिल्लीच्या कारभारात कधिही न दाखवलेली मानसिकता व प्रखर राजकीय इच्छाशक्ती (उदा. कंत्राटी-कामगारपद्धतीचं निर्मूलन अथवा बेफाम कार्बन-ऊत्सर्जन करणाऱ्या काँक्रिटच्या विकास-प्रक्रियेला रोखत दिल्लीच्या निसर्ग-पर्यावरणाचं संतुलन राखणं)'' अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीकडे आहे काय???''**

अन्यथा, आमच्या महाराष्ट्रात जशा शिवजयंत्या किंवा आंबेडकर जयंत्या-मयंत्या फक्त साजर्या केल्या जातात... पण, व्यवहारात त्यांच्या राजनीतिला अथवा संदेशाला, तत्त्वज्ञानाला कधिही उतरवलं जात नाही, अशा नुसत्या 'वरकरणी पद्धती'चं फसवं राजकारण निदान 'भगतसिंगां'च्या नावाने तरी नकोच!

**अरविंदजी, याद राखा... आपण भगतसिंगाचं नाव घेऊन कारभार करण्याचा संकेत आम्हाला देताय... भगतसिंग, हा 'साम्राज्यवाद आणि भांडवलशाही'विरुद्ध लढणारा डाव्या विचारसरणीचा आणि 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोशिएशन'चा सदस्य होता, तेव्हा तुम्ही ''कंत्राटी-कामगार पद्धती'च्या (contract-labour system) निर्मूलनाचं काय करणार आहात, याचा जबाब द्या अरविंदजी...** आमचं चुकत नसेल तर, याच कंत्राटी-कामगार पद्धतीविरोधात आपण निवडणूक प्रचारात फायदा व्हावा म्हणून, पंजाबमध्ये मोहाली येथे नोकरीत 'कायम' करण्यात यावं म्हणून अनेक वर्षे तडफडणार्या शालेय शिक्षकांच्या आंदोलनात याच कंत्राटी-कामगारपद्धतीविरुद्ध आपण भाषणबाजी केली होतीत, बरोबर ना, अरविंदजी? पण, दिल्लीत सरकारी अथवा खाजगी क्षेत्रातली ''गुलामी व नव-अस्पृश्य'' स्वरुपातील 'कंत्राटी-कामगार पद्धत' आपण नाहीशी केलीत, असं आजवर काहीही घडलेलं नाही.

तेव्हा, 'दिल्लीत तो 'आप' हो ही... लेकिन, 'ठेकेदारी-मजदूरी' हटाने (contract-labour system) के मामले की दिल्ली, 'आप'को नजदिक लगती है या दूर... ये हम जरुर देखेंगे, तभी तो 'आप'के भगतसिंग के प्रति लगन और लगाव की सही पहचान होगी!

जाता जाता, ....''राजकारण, समाजकारण आणि अध्यात्म'' याची सांगड घालत 'स्थानिक-अस्मिता' जपणारं, निसर्ग-पर्यावरणाच्या संरक्षण-संवर्धनासाठी 'कार्बन-ऊत्सर्जन' रोखू पहाणारं, मर्यादित जनसंख्या व पर्यावरणपूरक साधी अर्थव्यवस्था व जीवनशैली कवेत घेणारं; तसेच, शोषण-भ्रष्टाचार रोखू शकणारं जातिवंत 'राजकारण' या देशात केलं जाण्याची नितांत गरज आहे आणि हे अरविंद केजरीवाल यांना मान्य आहे का, हे ही पुढील काळात दिसून येईलच... धन्यवाद!''

***...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**




तुम्हाला शनीपिडेपेक्षा डेंजर 'ईडी'पिडा सुरू होण्याची चिन्हे आहेत.त्यावर उपाय म्हणजे कमळाचे फुल जवळ ठेवा..

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)